|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ३९ सोमवार दि. ६ ऑक्टोबर २०२५ ते रविवार दि. १२ ऑक्टोबर २०२५ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## टीव्ही बंद करण्यावरून वाद झाला मुलाने जन्मदात्या बापाचा खून केला

पुणे : क्राईम रिपोर्टर

आजकल माणूस इतका कृतघ्न बनला आहे की त्याला रक्ताच्या नात्याची सुद्धा ओळख राहिलेली नाही. त्यामुळे शुल्लक कारणावरून कुटुंबातील लोक एकमेकांचे मुडदे पाडून रक्ताच्या नात्याला कलंक लावतात. कधी संपत्तीच्या वादात मुलगा बापाची हत्या करतो. तर कधी भाऊ भावाचा गळा चिरतो. नाती गोती जणू शिल्लकच राहिलेली नाहीत. पुण्याच्या हिंजवडीत अशाच एका घटनेत बापाने मुलाला टीव्ही बंद करुन माझ्या डोळ्यात औषध टाक एवढे सांगितले. त्यावरून दोघांमध्ये वाद झाला आणि हा वाद इतका ...पान २ वर

# पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे आरोपी पळून गेला एक बाल हत्या केलेल्या नराधमाने दुसरा खून केला

भिवंडी : क्राईम रिपोर्टर



व्यसन कोणतेही असो एकदा का माणूस व्यसनाच्या आहारी गेला की त्यातून त्याची सुटका होत नाही. त्या व्यसनातच त्याच संपूर्ण आयुष्य बर्बाद झालेले असते. खास करुण दारु आणि बाईंचे व्यसन भयंकर असते. ही दोन्ही व्यसने सहसा सुटत नाहीत. शरीर सुखाची चटक लागलेला माणूस अक्षरशः विकृत बनलेला असतो आणि आपली हीच विकृति शमवण्यासाठी तो कोणत्याही थराला जाऊ शकतो. वय किंवा नात्या गोत्याचाही विचार करीत नसतो. आपली तहान भागवण्यासाठी तो सतत सावज शोधित असतो. असे विकृत नराधम वासनेने वखवखलेले असतात. त्याच्याकडून लहान मुला–मुलींची शिकार केली जाते. त्यामुळे अशा गुन्ह्यांतील आरोपींना फासावर लटकवण्यासाठी जी कायद्याची प्रक्रिया असते, जी अत्यंत सुरक्षितपणे लवकरात लवकर पूर्ण करायची असते. जेणेकरून लोकांचा पोलिसांवर आणि न्याय पालिकेवर विश्वास कायम राहिल. त्याचबरोबर अशा प्रकारच्या गुन्ह्यांना सुद्धा आळा बसेल. मात्र काही वेळा पोलिसांच्या बेफिकिरीमुळे बाल अत्याचार प्रकरणातील विकृत आरोपी कधी पोलिसांच्या होती लागत नाहीत. तर कधी कधी अटक झालेले आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देवून पळ काढतात आणि हेच आरोपी भविष्यत् पुनः तसाच गुन्हा करतात. कारण त्यांच्यातील लैंगिक विकृति त्यांना स्वस्थ बसु देत नाहीत. त्यामुळे पुनः तसाच गुन्हा त्यांच्या हातून घडतो. त्यामुळे असे लैंगिक अत्याचार करणाऱ्या गुन्हेगरांबाबत पोलिसांनी अधिक सावधगिरी बाळगायला हवी, पण पोलीस तशी सावधगिरी बाळगत नसल्याने, असाच एक भयंकर आणि संतापजनक प्रकार भिवंडीमध्ये घडला आहे. लहान बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या करणारा एक आरोपी पोलिसांनी पकला होता. पण अशा गंभीर गुन्ह्यांत अटक केलेल्या आरोपीला न्यायालयीन सुनावनीसाठी नेताना पोलिसांनी आवश्यक ती खबरदारी न घेतल्याने तो आरोपी पोलिसांच्या तावडीतून निसटला आणि पुनः त्याने तसाच गुन्हा करताना आणखी एक बालिकेवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केली. मात्र त्याला अटक करण्यात आली असून पोलिसांनी त्याच्या बाबतीत आता तरी काळजी घेवून त्याची न्यायालयीन प्रक्रिया सुरक्षितपणे पार पाडावी आणि त्याला फासावर लटकवावे अशी मागणी लोक करीत आहेत.



अशाचा एका गुन्ह्यामध्ये शहर पोलिस ठाण्यात हत्येसह पोस्को अंतर्गत दाखल गुन्ह्यात पोलिसांनी २० सप्टेंबर २०२३ रोजी मोठ्या शिताफीने सलामत अली याला बिहार येथून ताब्यात घेत अटक केली होती.

सहा वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून हत्या करण्याच्या गुन्ह्यात अटक असलेल्या आरोपीस भिवंडी न्यायालयात सुनावणी साठी आणले असता पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाल्या नंतर या नराधम विकृत आरोपीने पुन्हा एकदा तसेच कृत्य करीत एका सात वर्षीय मुलीवर अत्याचार करून तिची हत्या केली आहे. सुदैव म्हणजे पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेत या आरोपीचा अवघ्या पाच तासात मुसक्या आवळल्या आहेत. सलामत अन्सारी वय ३४ रा. मधुबनी बिहार असे अटक आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बुधवार १ ऑक्टोबर रोजी शहरालगतच्या काटई ग्रामपंचायत हद्दीतील मांगत पाडा येथील सात वर्षीय अल्पवयीन चिमुरडी दुपारी तीन वाजता शौचालया साठी काही अंतरावरील चाळीच्या सार्वजनिक शौचालयात जाण्यास निघाली. बराच वेळ झाला तरी ती माघारी न आल्याने कुटुंबीयांनी शोध घेतला असता नजिकच्या चाळीतील एका बंद खोलीच्या झरोक्यातून पाहण्याचा प्रयत्न केला. त्या खोलीत चिमुरडीने शौचालयास जाताना सोबत नेलेली बादली आढळल्याने नागरिकांनी खोलीचे कुलूप तोडून खोलीत प्रवेश केला. तर तेथे एका कोपऱ्यात प्लास्टिक गोणीत चिमुरडीचा मृतदेह निपचित तोंडात ...पान २ वर

# ‘दिक्षा’च्या मैत्रीची दिशाच चुकली एकतर्फी प्रेमामुळे जीवाला मुकली





कुडाळ (सिधुंदुर्ग) : क्राईम रिपोर्टर

मैत्रीतून प्रेमाची भावना फुलते हे खरे असले, तरी दोन भिन्नलिंगी माणसांमधील मैत्रीतून प्रेम होतेच असे नाही. पण काही तरुण मात्र एखादी मुलगी त्यांच्याशी मन मोकळेपणे बोलली की तिचे आपल्यावर प्रेम आहे असे समजतात आणि नकार मिळाला की मग त्यांचा ईगो दुखवतो आणि एकतर्फी प्रेमातून त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते. कुडाळ तालुक्यातील घावनाळे गावात अशीच एक घटना घडली तिमाजी बागवे यांची मुलगी दीक्षा हिची कॉलेजला जाताना कुणाल कुंभार या तरुणाशी ओळख झाली. या ओळखीतून दोघांच्यात मैत्रीचे नाते निर्माण झाले. मात्र दीक्षासाठी ही केवळ मैत्री होती. पण कुणाल याला मात्र दीक्षा त्याच्यावर प्रेम करीत आहे, ऐसे वाटत होते. त्यातून त्याने तीला प्रपोज केले. पण तिने नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या कुणालने तिची हत्या करुण मृतदेह लपवून ठेवला. २ महिन्यांनी या हत्याकांडाला वाचा फुटली. या प्रकरणी आरोपी कुणाल याला अटक केली आहे.

घावनळे वायंगणवाडी येथे तिमाजी बागवे हे पत्नी मुलीसह राहयला आहेत. त्याची १७ वर्षीय मुलगी दीक्षा ही सावंतवाडी येथे १२ वीचे शिक्षण घेत होती. ती रोज सकाळी कॉलेजला जात होती आणि दुपारपर्यंत घराकडे परत येत होती. घरची परिस्थीती गरिबीची असल्याने दीक्षाला शिक्षण महत्वाचे होते. चांगले शिक्षण घेऊन तिला तिचे करियर करायचे असल्याने ती आपल्या शिक्षणाकडे लक्ष देत होती. त्यातच ती कळत न कळतपणे कुणाल कुंभार नावाच्या तरूणाच्या




संपर्कात आली. तो ही सावंतवाडी येथे आयआयटी कॉलेजमध्ये शिक्षण घेऊन डॉ.शरद पाटील याच्याकडे काम करीत ...पान २ वर

## व्याभिचारी काकाला जराही नव्हती कीव पाप लपवण्यासाठी पुतनीचा घेतला जीव

पाटण (कोयनानगर) : क्राईम रिपोर्टर

आजकल समाजामध्ये व्यभिचार इतका बोकाळला आहे की माणूस नात्या गोत्याचाही विचार करीत नाही. परिणामी चार भिंतीच्या आतही महिला सुरक्षित नाहीत. काहींचे नात्यातील लोकांकडून जबरदस्तीने लैंगिक शोषण केले जाते. तर काही महिला शरीर सुखाच्या हव्यासापोटी स्वतःच नाती गोती विसरुन कुटुंबातील पुरुषांशीच संबंध ठेवतात. मात्र मनात कुठेतरी समाजाची भीती असल्याने असे संबंध फार काळ टिकट नाहीत. किंवा असे संबंध उघडकीस येवू नयेत म्हणून माणूस कोणत्याही थराला जातो. पाटण येथे पुतनीलाच फुस लावून पळवून नेणाऱ्या एका काकाने नंतर समाजाच्या भीतीने तिची हत्या केली आणि मृतदेह पुरला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पाटण तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीचा निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना बुधवारी उघडकीस आली आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये पीडित युवतीला आरोपीने फूस लावून पळवून नेले होते. मात्र, नात्यातील युवती असल्याने आपली बदनामी होईल, म्हणून त्याने युवतीचा खून करून तिचा मृतदेह पुरल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.तपासादरम्यान आरोपीने पीडितेशी प्रेमसंबंध असल्याचे मान्य केले. नात्याने तो तिचा काका लागत असल्याने बदनामीच्या भीतीने आरोपीने दि. ३ जानेवारी २०२५ रोजी कोयना ...पान २ वर

# आईचा भयंकर राग मुलाच्या प्राणावर बेतला लॉलीपॉप मागताच चिमुकल्याचा जीव घेतला

पालघर : क्राईम रिपोर्टर



आरोपी पल्लवी

आई–वडिल आपल्या मुलांवर जीवापाड प्रेम असतात. कारण मुले हीच त्यांच्या भविष्याचा आधार असतात. कधी मुले मस्ती करू लागली किंवा नको तो हट्ट करायला लागली की आई वडील त्याना दम देतात. काही वेळा मुलांना चार फटकेही देतात. खास करुन मस्तीखोर तसेच नको ते बालहट्ट धरणारी मुले आई वडिलांचा अधिक मार खातात. तर पतीपासून विभक्त राहून आपल्या मुलांचा सांभाळ करणाऱ्या महिलेसमोर अनेक अडचणी असतात. अशावेळी मुलांनी त्रास दिल्यास तिचा संयम संपतो आणि मग ती आपल्या मनातील राग मुलांवर काढते. पालघरच्या काशीपाडा भागात राहणाऱ्या एक महिलेने, मुलानी चिकन लॉलीपॉप मागितले म्हणून त्यांना लाटण्याने इतके बेदम मारले की तिच्या मारहाणीत एका मुलाचा मृत्यु झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी आईला अटक केली आहे.



आईकडे चिकन लॉलीपॉप खाण्यासाठी हट्ट केल्याने आईने स्वतःच्याच दोन मुलांना लाटण्याने बेदम मारहाण केली. या मारहाणीत एका मुलाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पालघर येथील काशीपाडा परिसरात घडल्याची माहिती आहे. चिन्मय धुमडे असं मृत सात वर्षाच्या मुलाचे नाव आहे. तर लव्या ही मुलगी रुग्णालयात उपचार घेत आहे. याप्रकरणी पालघर पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली असून तिच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल केल्याची माहिती, जिल्हा पोलीस अधीक्षक यतीश देशमुख यांनी दिली. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे. पालघर येथील जुना सातपाटी रस्त्यावरील काशीपाडा येथे घोडेला कॉम्प्लेक्स, शाम रिजेन्सी नावाची इमारत आहे. या ठिकाणी पल्लवी धुमडे ...पान २ वर

## पत्नी नांदायला येईना पती चिडला रागाच्या भरात तिचा मुडदा पाडला

मुंबई : क्राईम रिपोर्टर

पती–पत्नी यांच्यातील वाद नेहमीचाच असतो. पण हा वाद जेंव्हा वाढतो तेंव्हा दोन्ही कडच्या कुटुंबातील लोकांनी एकत्र येऊन तो सोडवायचा असतो. पण तसे झाले नाही तर मात्र दोघांमध्ये इतका दुरावा निर्माण होतो कि प्रकरण घटस्फोटापर्यंत जाते किंवा पत्नी कायमची माहेरी जाऊन रहाते. मुंबईच्या पवई पवईच्या रहेजा संकुल परिसरातील अशाच एका घटनेत पत्नी नांदायला येत नाही म्हणून एका इसमाने तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पवईत राहणाऱ्या एका ५६ वर्षीय महिलेची हत्या करण्यात आली असून या प्रकरणी पवई पोलिसांनी महिलेच्या पतीला अटक केली. सावित्रीदेवी चंद्रभान असे या महिलेचे नाव असून ती पतीसोबत राहात नव्हती. पुन्हा एकत्र राहण्यासाठी पती तिचे मन वळवत होता. मात्र तिने नकार दिल्याने रविवारी संतापलेल्या पतीने उशीने तोंड दाबून तिची हत्या केली. सावित्री देवी चंद्रभान (५६) ही महिला वकील आहे. ती पवईच्या रहेजा संकुल परिसरात एकटी रहात होती. ती रविवारी दुपारी आपल्या घरात बेशुद्धावस्थेत आढळली. स्थानिक रहिवाशांनी या संदर्भात मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी तिला रुग्णालायत दाखल केले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. श्वास गुदरमल्यामुळे तिचा मृत्यू झाला होता. त्यामुळे यामागे घातपाताचा संशय ...पान २ वर

# अनैतिक संबंध अखेर प्राणघातक ठरले कोयत्याचे वार करून पत्नीला मारले

हातकणंगले (पेठवडगाव) : क्राईम रिपोर्टर





अनैतिक संबंधांचा शेवट हा ठरलेला असतो. कारण असे संबंध फार काळ टिकट नाहीत. मात्र त्यांचा शेवट भयंकर असतो. भादोले गावातील प्रशांत पाटील याच्या पत्नीचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध होते. त्यामुळे दोघांमध्ये वाद होऊ लागले. त्यामुळे प्रशांत तिला मारहाण करू लागला. पण ती काही ऐकत नव्हती. त्यामुळे प्रशांत याने तिच्या बाबत टोकाचा निर्णय घेतला. रोहिणीच्या वडिलांना भेटण्यासाठी दोघे पती–पत्नी घराबाहेर पडले. पण प्रशांतच्या मनी काहीतरी वेगळेच होते. अर्ध्या रस्त्यावर गेल्यावर प्रशांत याने आसपास कुणी नाही असे पाहून पत्नीच्या डोळ्यात मिर्चीपूड टाकून तिच्यावर सपासप कोयत्याने वार करून तिची हत्या केली. या प्रकरणी अवघ्या ६ तासात पोलिसांनी प्रशांत याला अटक केली.

हातकणंगले तालुक्यातील पेठवडगाव जवळील भादोले येथे प्रशांत पाटील हा पत्नी रोहिणी आई वडिल आणि दोन मुलीसह राहयला आहे. त्याच्या लग्नाला आठ वर्ष झाली त्यांना एक सहा वर्षाची तर दुसरी चार वर्षाची अशा दोन मुली आहेत. प्रशांत हा दुचाकी गाडया दुरूस्तीचा व्यवसाय करीत असल्याने आजुबाजुच्या परिसरातील लोक त्याला गुंडा मिस्त्री म्हणून ओळखत होते. सुरूवातीला दोघांचा संसार सुखा समाधानाचा चालू होता. परंतु गेल्या दोन चार वर्षात प्रशांत याला दारू पिण्याचे व्यसन लागले होते. दुकान बंद करून तो रोज रात्री दारू पिऊनच घराकडे येत होता. दारूच्या नशेत तो पत्नी रोहिणी हिच्यावर संशय घेऊन तिचे गावातील कोणाबरोबर तरी लफडे चालू असल्याचा संशय घेऊन तिला मारहाण करीत होता. तिला शिवीगाळ करीत तिचा तो उद्दार करीत होता. खरे तर रोहिणी ही दिसायला सुदंर देखणी आणि तरूण असल्याने ती कोणाला तरी चिकटलेली आहे ...पान २ वर

## संतापलेल्या जन्मदात्याची मती भ्रष्ट झाली चिमुकल्याचा जीव घेऊन आत्महत्या केली





बीड (गेवराई) : क्राईम रिपोर्टर

मृत्यू जर माणसाच्या मागावर असेल तर त्याला कुणीही रोखू शकत नाही. बीडच्या गेवराईमध्ये अशीच एक घटना घडली आहे. कौटुंबिक वादातून पती–पत्नीने विष घेतले होते. मात्र त्यांना तत्काळ रुग्णालयात नेवून उपचार केल्याने हे दांपत्य बचावले. पण चार दिवसांनी रुग्णालयातून घरी आल्यावरही, पतीच्या मनातील राग गेलेला नसल्याने त्याने आपल्या ४ महिन्याच्या बाळाला पाण्याच्या बादलीत बुडवून त्याचा जीव घेतला आणि त्यानंतर स्वतःही गळफास घेवून आत्महत्या केली. मृत्युने शेवटी त्याला गाठलेच! या घटनेने त्याची पत्नी आणि कुटुंबियांना मोठा धक्का बसला आहे.

कौटुंबिक कारणातून झालेल्या वादानंतर पती–पत्नीने चार दिवसांपूर्वी विष घेतले. खाजगी रुग्णालयातून उपचार ...पान २ वर

# पत्नीला समजवण्याचा प्रयत्न फोल ठरला रागाच्या भरात पतीने तिचा गळाच चिरला

सांगली : क्राईम रिपोर्टर



माणसाला जशी पोटाची भूख असते तशीच शरीराचीही भूक असते. अशावेळी पुरुष असो किंवा स्त्री तीला ते सुख मिळाले नाही, तर तिचे वाकडे पाऊल पडते. सांगलीतील शांतीनगरात राहणाऱ्या काजलच्या बाबतीत तसेच घडले. तिचा नवरा दारुडा असल्याने तिला शरीरसूख देत नव्हता. त्यामुळे तिने दुसऱ्याला जवळ केले. मात्र याची कुणकुण तिच्या नवऱ्याला लागल्याने तो तिला मारहाण करू लागला. पण ती काही तिच्या प्रियकराला सोडायला तयार नव्हती. अखेर प्रशांतच्या संयमाचा बांध फुटला आणि त्याने पत्नीचा गळा चिरून तिची हत्या केली आणि स्वतःच पोलीस ठाण्यात जाऊन आत्मसमर्पण केले.



सांगली शहरातील खणभाग येथील शांतीनगरमध्ये प्रशांत एडके हा पत्नी काजल आणि दोन मुलीसह भाड्याने राहयला आहे. तो मोलमजुरी करून कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता. अलिकडेच त्याला दारू पिण्याचे व्यसन लागलेले असल्याने तो रोज कामावरून घरी येताना दारू पिऊनच येत होता. लग्नानंतर त्याचा काही वर्षच संसार सुखासमाधानाचा चालला. प्रशांत हा रोज दारू पिऊन येवून काजल हिला मारहाण करीत असल्याने ती भांडण झाले की, कोल्हापूर जिल्हयातील मलकापुर येथे रागाने निघून जात होती. याला कारण ही तसेच होते. प्रशांत हा तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला मारहाण करीत होता. त्यामुळे ती ही चिडत होती आणि रागाने आपल्या माहेरी निघून जात होती. गेल्या दोन तीन वर्षांपासून काजल हिचे कोणाबरोबर तरी प्रेमसंबंध आहेत याची ...पान ६ वर

पान १ वरून...

## टीव्ही बंद करण्यावरून वाद झाला...

विकोपला गेला की मुलाने बापाची शस्त्राने वार करून निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. किरकोळ वादातून मुलाने वृद्ध वडिलांवर चाकूने वार करुन त्यांच्या खून केल्याची धक्कादायक घटना कोथरूडमधील जयभवानीनगर परिसरात घडली. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी मुलाला अटक केली. तानाजी पायगुडे (वय ७२, रा. जयभवानीनगर, पौड रस्ता, कोथरूड) असे खून झालेल्यांचे नाव आहे. या प्रकरणी मुलगा सचिन तानाजी पायगुडे (वय ३३) याला अटक करण्यात आली. याबाबत तानाजी यांची पत्नी सुमन (वय ६८) यांनी कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पायगुडे कुटुंबीय जयभवानीनगर भागातील चाळीत राहायला आहेत. पायगुडे यांचे बैठे घर आहे. गुरुवारी (२ ऑक्टोबर) दुपारी साडेबाराच्या सुमारास तानाजी पायगुडे आणि त्यांचा मुलगा आरोपी सचिन हे पोटमाळ्यावर होते. दसरा असल्याने पायगुडे कुटुंबीय घरात होते. तानाजी यांच्या डोळ्यात औषध टाकायचे होते. त्यांनी मुलगा सचिन याला दूरचित्रवाणी संच बंद करण्यास सांगितले. या कारणावरुन सचिन आणि वडील तानाजी यांच्यात वाद झाला. वादातून सचिनने घरातील चाकूने वडील तानाजी यांचा गळा आणि चेहऱ्यावर चाकूने वार केले. पोटमाळ्यावरील आरडाओरडा ऐकून तानाजी यांची पत्नी सुमन या पोटमाळ्यावर गेल्या. तेव्हा तानाजी हे गंभीर जखमी अवस्थेत पडल्याचे त्यांनी पाहिले. आरोपी सचिन घरातून पसार झाला होता. गंभीर जखमी अवस्थेतील तानाजी यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती पोलिसांना कळविण्यात आली. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त भाऊसाहेब पटारे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप देशमाने यांनी घटनास्थळी भेट दिली. पसार झालेला आरोपी सचिन याला वडिलांचा खून केल्याप्रकरणी अटक करण्यात आली असून, सहायक पोलीस निरीक्षक पवार तपास करत आहेत.

## 'दिक्षा'च्या मैत्रीची दिशाच चुकली...

होता. तो गोठसे मांडशेतवाडी येथील असल्याने सावंतवाडी येथे कॉलेजला जाता येता दोघांची नजरा नजर होत होती. दोघांची नजरा नजर होत असताना तिच्या मोहक नाजुक अशा सौदर्याने कुणालला तिची भुरळ पडली. तो तिच्या प्रेमात पडला. तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत असताना एकदा दोनदा त्याने तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न ही केला. तिने ही त्याला तसा प्रतिसाद दिल्याने दोघांची चांगली ओळख झाली. ओळखीतूनच दोघांचे प्रेम बहरू लागले. परंतु तिने तसे त्याला कधीच सांगितले नाही की, मी तुझ्यावर प्रेम करते ती एक मित्र म्हणून त्याच्याशी बोलत होती, गप्पा मारत होती दोघांच्या विचारांची देवाण घेवाण होत होती. त्याने मात्र यातून वेगळाच अर्थ काढला होता. दीक्षा आपल्यावर प्रेम करते असे त्याला वाटत होते. गेल्या दीड वर्षापासून ते दोघे एकमेकांच्या संपर्कात होते. दोघे ही फोनवरून बोलत होते बाहेर भेटत होते. मात्र दीक्षाच्या मनात कुणाल कुंभार विषयी काहीच नसल्याने ती त्याच्याशी बिनधास्तपणे बोलत होती. त्याचे मात्र तिच्यावर प्रेम जडले होते. आतापर्यंत त्याने तिच्याकडे कधीच आपले प्रेम किंवा ती भावना व्यक्त केलेली नव्हती. कुणाल कुंभार याच्या ही घरची परिस्थीती तशी बेताचीच होती त्यामुळे तो ही बांटमाचा चाळा येथील डॉ.शरद पाटील याच्याकडे काम करीत होता. कॉलेजवरून घरी आला की तो अर्धवेळ डॉक्टरांच्या फर्मवर काम करीत होता. कधी तरी दीक्षाला आपल्या मनातील भावाना बोलून दाखवून आपले प्रेम व्यक्त करावे असे सारखे वाटत होते परंतु तसे त्याचे धाडस होत नव्हते. खरे तर ती त्याच्यावर प्रेम करीत नव्हती, तिची स्वप्ने, ध्येय वेगळी होती तिला शिक्षण घेऊन करियर करायचे असल्याने ती प्रेम या फंदात पडणारी नव्हती. मित्र म्हणून ती कुणाल कडे पाहत होती परंतु त्याच्या मनात मात्र वेगळचे होते. तो तिच्यावर मनापासून प्रेम करीत होता. त्याला ती हवी होती एकदा त्याने धाडस करून तिला प्रपोज ही केले. परंतु तिने त्यावेळी त्याला नकार दिला.पहिल्यांदा प्रेमात मुलगी नकार देत असते तिचा नकार आपण होकारात बदलू अश आशा त्याला होती. म्हणून तो सारखा तिच्या मागे लागला होता. तिने मात्र त्याला आपला निर्णय दिलेला होता. तो तिचे काहीच ऐकायला तयार नव्हता. सारखा दीक्षाला भेटून तिच्याशी मोबाईलवर संपर्क करून तु माझ्यावर प्रेम कर. मी तुझ्यावर प्रेम करतो मला तु हवी आहेस असे म्हणत होता. त्याच्या अशा विचित्र वागण्याने खरे तर दीक्षा वैतागलेली होती. तिने आपल्या घरी आई वडिलांना कुणाल कुंभार हा त्रास देत असल्याचे ही सांगितले होते. तिच्या आई वडिलांनी तिला त्याच्याकडे लक्ष देवू नकोस तुझे तु एकटी कॉलेजला जात जा आणि घरी येत जा. त्याचा त्रास जास्त झाल्यास आपण पुढे बघु असे त्यांनी तिला सांगितले होते. त्यामुळे हल्ली दीक्षा ही कुणालचा फोन ही घेत नव्हती अथवा त्याला भेटण्याचे ही टाळत होती. तरी ही तिने त्याला एकदा दोनदा सांगून टाकले की, माझे कोणावर प्रेम नाही, मला त्यात इंटरेस्ट नाही तु माझ्या नादाला लागू नकोस तिचा नकार कुणालला पचवणे खरे तर अवघड झाले होते. तिला ती कोणत्या ही परिस्थीती पाहिजे होते. तो सारखा तिच्या मागे लागला होता. ती मात्र त्याला वेळोवेळी नकार देत होती. तिचा नकार म्हणजे त्याला अपमान वाटत होता. गेल्या दीड वर्षापासून आपण हिच्यावर प्रेम करतो आहोत आणि ही आपल्याला नकार देत आहे याचा त्याला राग आलेला होता. त्याने आता शेवटचे या गोष्टीचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरविले. ती आपली झाली नाही तर तिला दुसऱ्या कोणाचीच होऊ दयायचे नाही असे त्याने ठरविले.तो तशा संधीची वाट पाहत होता. दीक्षाला दुसऱ्या कोणाचीच होऊ दयायचे नाही आपल्याला सोडून ती दुसऱ्या कोणाचीच कशी होते ते बघु या असा त्याने विचार केला. हल्ली दीक्षा त्याला भाव ही देत नव्हती. तिला भेटायला बोलवले की ती बाहेर ही येत नव्हती. तिला काही तरी करून बाहेर घेऊन जायचे आणि तिच्यावर जबदरस्ती करून तिच्याशी सेक्स करायची अशी त्याची इच्छा होती.

२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ६.३०वाजणेच्या सुमारास नेहमीप्रमाणे दीक्षा ही घरातून कॉलेजला बाहेर पडली. दुपार झाली, संध्याकाळ झाली तरी ती त्या दिवशी घराकडे परत आली नाही. त्याच दिवशी दुपारी कुणालने तिच्या मोबाईलवर संपर्क साधत मला तुला शेवटचे भेटायचे आहे. एकदा मला तु भेट त्यानंतर तुझी वाट वेगळी माझी वाट वेगळी असे सांगत फोन करून तिला भेटायला बोलाविले. ती दुपारी कॉलेज संपल्यावर त्याला भेटायला आली. त्याने त्याच्या बाईकवर तिला बसविले. ते दोघे आंबेरी-शिवापुर रस्त्यावरून वाडीसच्या मुख्य रस्त्यापासून सुमारे १०० मीटर आत कच्चा रस्त्यावरून बांटमाचा चाळा येथील डॉ.शरद पाटील याच्या मळ्यात नेले. तेथे तिला निर्जन स्थळी नेवून तो तिच्याबरोबर बोलता बोलता तिच्याशी लगट करीत आपले प्रेम व्यक्त करीत तु माझी आहेस दीक्षा, तुला मी दुसऱ्या कोणाची होऊ देणार नाही असे म्हणत तो तिच्या अंगाशी झोंबाझोबी करू लागला. तिने त्याला बाजुला ढकलून देत त्याच्यापासून लांब जात तु बाजुला हो कुणाल, माझ्या अंगाला हात लावू नकोस, नाही तर याचे परिणाम गंभीर होतील असे सांगत ती तेथून त्याच्या तावडीतून सुटून पळून जाण्याचा प्रयत्न करीत होती. ती काही ऐकत नाही हे त्याच्या लक्षात आल्यावर पळणाऱ्या दीक्षाला आताच आवरले गेले नाही तर ही बाहेर जावून माझी इज्जत अब्रु घालवेल असे त्याला वाटले. त्याने तिला आडवले.एका शेतमांगरात नेऊन तिचा गळा जोरात आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत होती. ओरडत होती मला सोड,म्हणत होती. परंतु कुणालच्या डोक्यात राक्षस शिरल्याने रागाच्या भरात त्याने तिचा गळा इतका जोरात आवळून धरला की, ती काही क्षणातच खाली कोसळली. तिचा जागीच मृत्यु झाला. त्यानंतर त्याने तिचा मृतदेह शेतमांगरातील अडगळीत लपवून ठेवला. तेथून तो निघून गेला. इकडे सकाळी कॉलेजला गेलेली दीक्षा दुपारपर्यंत संध्याकाळ पर्यत घराकडे परत आली नाही म्हणून तिच्या आई वडिलांनी तिचा शोध घ्यायला सुरूवात केली. परंतु तिचा शोध कुठेच लागत नव्हता. तसेच तिचा मोबाईल फोन ही स्विच ऑफ लागत होता. दुसऱ्या दिवशी तिच्या आईने कुडाळ पोलीस स्टेशन गाठून आपली १७ वर्षीय मुलगी दीक्षा तिमाजी बागवे ही दि.२ ऑगस्ट रोजी सावंतवाडी येथे कॉलेजला गेली ती परत आली नाही तिचे कुणी तरी अपहरण करून तिच्या जीवाचे बरे वाईट केले असावे अशी शंका व्यक्त करून तशी तक्रार दिली. कुडाळ पोलीसांनी या घटनेची गांभिर्यानी दखल घेत या घटनेचा तपास चालू केला. बेपत्ता दीक्षाचे मोबाईल कॉलचे डिटेल्स तपासत असताना तिच्या मोबाईल वर कुणाल कुंभार याचे फोन आल्याचे दिसत होते. पोलीसांनी कुणालला ताब्यात घेऊन त्याच्याकडे दीक्षा बागवे हिची चौकशी करीत असताना तो पोलीसांना उडवा उडवीचे उत्तरे देत होता. दीक्षा बरोबर आपले कोणतेचे कसलेच संबंध नाहीत असा पवित्रा तो घेत होता. दीक्षा बेपत्ता होऊन जवळपास दीड महिना होत आला होता तरी ही कुडाळ पोलीसांना तिचे काय झाले आहे. ती कुठे बेपत्ता झाली आहे याचा शोध लागत नव्हता. या दीड महिन्याच्या काळात दीक्षाच्या बेपत्ता होण्याच्या प्रकरणात पोलीस वेगवेगळ्या ॲगलने तपास करीत होता. त्याचा सपुर्ण फोकस कुणाल कुंभार याच्यावर होता. कारण तिच्या दीक्षाच्या मोबाईलवर घटनेच्या दिवशी म्हणजे बेपत्ता होण्याच्या आधी त्याचेच फोन आल्याचे तसेच कुणाल याचे दीक्षावर एकतर्फी प्रेम असल्याचे पोलीसांना समजले होते. शेवटचा उपाय म्हणून पोलिसांनी कुणाल याला पोलीसी खाक्या दाखवित तिच्या मोबाईलवर आलेले तिचे शेवटचे कॉल डिटेल्स त्याला दाखविले असता तो गळून पडला. त्याने आपला गुन्हा कबुल करीत तो का? आणि कशासाठी केला याची माहिती देत दीक्षा हिचा गळा दाबून आपणच तिची हत्या केली असल्याचे अखेर ५८ दिवसांनी मान्य केले. तसेच तिचा मृतदेह बांटमाचा येथील डॉ.शरद पाटील याच्या शेतमांगरात लपवून ठेवला असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन घटनास्थळ गाठले.त्याने लपवून ठेवलेल्या ठिकाणी दीक्षाचा मृतदेह कुजत चाललेला होता. तिच्या मृतदेहाची दुर्गंधी सुटत चालली होती. पोलीसांनी घटनास्थळी मयत दीक्षा हिच्या आई आणि आत्याला बोलावून घेतले. त्यांनी ही मृतदेह ओळखून तो दीक्षाचा असल्याचे पोलीसांना सांगितले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी सरकारी दवाखान्यात पाठवून दिला. उतरीय तपासणीनंतर अंत्यसंस्कारासाठी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेची फिर्याद कुडाळ पोलीसात मयत दीक्षा बागवे हिच्या आईने दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार दीक्षा तिमाजी बागवे (वय १७) हिच्या खुन प्रकरणी तिचा प्रियकर कुणाल कुंभार (वय २०) याच्या विरोधात आयपीसी कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून कुडाळ पोलीसांनी त्याला कुडाळ येथील कोर्टात हजर केले असता कोर्टाने त्याला ५ ऑक्टोंबर २०२५ पर्यतची पोलीस कोठडी सुनावली.या पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयता वापरलेली मोटार सायकल जप्त केली. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजेंद्र मगदुम यांच्या मार्गदर्शनाखाली कुडाळ पोलीस करीत आहेत.

## पत्नी नांदायला येईना पती चिडला...

पोलिसांना आला आणि त्यादृष्टीने पोलिसांनी तपास सुरू केला. हत्या झाली तेव्हा सावित्री घरात एकटी होती. ती पतीपासून वेगळी रहात होती. पोलिसांनी तिचा पती राजीवकडे चौकशी केली. सुरुवातीला त्याने या प्रकरणाशी आपला काहीच संबंध नसल्याचे सांगितले. मात्र पोलिसांनी केलेल्या सखोल चौकशीत त्याने हत्येची कबुली दिली. राजीव चंद्रभानविरोधात पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. सावित्री देवी चंद्रभान पतीसोबत पवईच्या रहेजा विहार परिसरात रहात होती. तिचा पती राजीव दोन वर्षापूर्वी खासगी विमान कंपनीतून निवृत्त झाला होता. त्यांच्यात पूर्वीपासून कौटुंबिक वाद सुरू होते. त्यामुळे मागील एक वर्षापासून ते वेगळे राहू लागले होते. राजीव मरोळ येथे, तर सावित्री पवईला रहात होती. दरम्यान, राजीवने पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय घेतला आणि तो सावित्रीचे मन वळविण्याचा प्रयत्न करीत होता. तो रविवारी दुपारी सावित्रीला भेटण्यासाठी तिच्या घरी आला होता. यावेळी त्याने पुन्हा सावित्रीला एकत्र राहण्याबाबत विचारले. मात्र सावित्रीने नकार दिला. या मुद्यावरून त्यांच्यात पुन्हा वाद झाला. रागाच्या भरात राजीवने उशीने तिचे तोंड दाबले. श्वास गुदमरून तिचा मृत्यू झाला. आरोपी राजीवला न्यायालयात हजर केले असता त्याची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. पवई पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

## पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे आरोपी...

कुरकुरे असलेला आढळून आला. ज्यामुळे कुटुंबीयांसह सर्व परिसर या घटनेने हादरला आहे. हा आरोपी विकृत नराधम असून याच गुन्हेगाराने १३ सप्टेंबर २०२३ रोजी शहरातील फेणेगाव येथे चाळीतील सहा वर्षीय चिमुरडीला खाऊचे आमिष दाखवत खोलीत बोलावून तिच्या वर अत्याचार करून हत्या करीत मृतदेह बादली मध्ये कोंबून पसार झाला होता. या घटने नंतर परिसरात शोध घेऊन ही न सापडल्याने अपहरणाच्या गुन्ह्यात तपास करताना परिसरातील खोलीतून दुर्गंधी येत होती. त्यावेळी १५ सप्टेंबर रोजी नजिकच्या चाळीतील खोलीतून पोलिसांनी मृतदेह शोधून काढला. त्यानंतर संशयित आरोपीचा तपास करताना पोलिसांनी नराधम सलामत अन्सारी यास बिहार राज्यातील मधुबनी जिल्ह्यातील नवादा या गावात वेषांतर करून पाळत ठेऊन अटक केली.त्याने गुन्हा कबूल केल्यानंतर त्यास अटक करून त्याची रवानगी कारागृहात केली होती. दरम्यान न्यायालयीन सुनावणीसाठी ४ ऑगस्ट २०२५ रोजी भिवंडी न्यायालयात ठाणे कारागृहातून पोलिस पार्टी घेऊन आली होती. त्यावेळी पोलिसांची नजर चुकवून आरोपी सलामत हा पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला होता. त्यामुळे पोलिस प्रशासनावर अनेकांकडून टीका होत असताना बंदोबस्ता वरील पाच पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. पोलिस आरोपीचा शोध घेत असताना आरोपी भिवंडी परिसरातच ओळख लपवून वावरत होता. त्यानंतर तो काटई ग्रामपंचायत हद्दीतील मांगत पाडा येथील एका खोलीत भाड्याने राहण्यासाठी एक आठवडे पूर्वी राहण्यास आला होता. त्यानंतर त्याने १ ऑक्टोबर रोजी ही दुष्कर्म केले आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून सर्व पोलिस आरोपीचा शोध घेण्यासाठी जंग जंग फिरत असताना भोईवाडा पोलीस ठाणे हद्दीतील दिवाण शहा तलाव येथे आरोपी संशयित अवस्थेत फिरत असताना भोईवाडा पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळून त्याचा ताबा निजामपूर पोलिसांकडे सोपवला आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता ८ ऑक्टोबरपर्यंत नराधमास पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे. माझ्या मुलीवर अत्याचार करणाऱ्यास सुद्धा तसेच मारून टाकावे तेव्हाच माझ्या मुलीच्या आत्म्याला व आम्हाला शांती मिळेल अशी मागणी पीडितेच्या आईने टाहो फोडत केली आहे.

## व्याभिचारी काकाला जराही नव्हती ...

धरणालगत युवतीचा गळा दाबून खून करून मृतदेह खड्ड्यात पुरला. ठाणेनगर पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडून कोयना नगर पोलिसांच्या ताब्यात दिले. पंचासमक्ष व वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मृतदेह उत्खनन करून नातेवाइकांकडे सोपविण्यात आला.कोयनानगर पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक एस. के. ओलेकर, पोलिस उपनिरीक्षक शिंगाडे, हवालदार एस. आर. ओव्हाळ, अजित शिंदे, संतोष पाटणकर, संतोष गायकवाड, साबीर मुल्ला, मंगेश महाडिक, सनी आवटे, धीरज महाडिक आदींनी ही कामगिरी केली. पोलिस पुढील तपास करीत आहेत.

## आईचा भयंकर राग मुलाच्या प्राणावर ...

(वय ४०) ही महिला तिचा मुलगा चिन्मय (वय ७) आणि मुलगी लव्या (वय १०) यांच्यासोबत तिच्या बहिणीच्या घरी राहत होती. पतीशी पटत नसल्याने काही महिन्यापूर्वी भाईंदर येथून पालघर शहरानजीकच्या काशीपाडा येथे राहण्यास आली होती. मुलगा चिन्मय आणि लव्या या दोघांनी आई पल्लवीकडे चिकन लॉलीपॉप खाण्यासाठी हट्ट धरला. नवरात्र सुरू असल्याने उपवास आहेत, चिकन लॉलीपॉप मिळणार नाही असे आईने दोनही मुलांना सांगितले. मात्र, मुलांनी चिकन लॉलीपॉप खाण्यासाठी आईकडे हट्ट धरला. यावेळी तिच्या राग अनावर झाला आणि आई पल्लवीने दोनही मुलांना लाटण्याने मारहाण केली. या मारहाणीत मुलगा चिन्मयच्या डोक्यात लाकडी लाटणे जोरात लागल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी पालघर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान सात वर्षाच्या चिन्मयचा मृत्यू झाला आहे. शुक्रवारी (२६ सप्टेंबर) रात्रीच्या सुमारास ही घटना घडली आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मुलाला मारहाण करून त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेली आरोपी आईच्या पल्लवी धुमडे हिच्या विरोधात पालघर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पालघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनंत पराड यांनी दिली. ह्या प्रकरणी आरोपी आई पल्लवी हिच्या विरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तिला अटक करण्यात आल्याचे पोलीस अधीक्षक देशमुख यांनी सांगितले. मात्र, या घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## अनैतिक संबंध अखेर प्राणघातक ठरले...

असे त्याला वाटत होते. याला कारण ही तसेच होते कारण हल्ली दिवसभर रोहिणी ही आपल्या मोबाईलवरून तासन तास कोणाबरोबर तरी बोलत असायची. ती कोणाबरोबर काय बोलत असते हे प्रशांतला समजत नव्हते. तरी ही तो ती कोणाबरोबर काय बोलत असते याचा माग काढत होता. त्यातच त्याला समजले की, पत्नी रोहिणी हिचे गावातीलच एका तरूणासोबत प्रेमप्रकरण सुरू असून तो आणि ती सारखे बाहेर भेटत असतात. तर कधी कधी तो तरूण रोहिणीला भेटायला घरी ही येत असतो. दुपारी घरी कुणी नसताना तो तरूण आला की, रोहिणी घरचा दरवाजा बंद करून घेत होती. या बंद दरवाज्या आड काय चालत असते हे शेजाऱ्यांना समजत होते. त्यामुळे त्या दोघांच्या संबंधाची चर्चा ही गावात होत होती. ही चर्चा प्रशांत याच्या कानावर देखील आली होती. त्यामुळे त्याची शंका खरी ठरत होती. त्यातून नवरा बायकोची रोज भांडणे होऊ लागली होती. भांडणात तो तिला या कारणातून मारहाण करीत तु त्याच्याबरोबरचे संबंध तोडून टाक आणि घरदार संसाराकडे मुलीच्या कडे लक्ष दे असे सांगत होता. तरी ही त्याचे काही ऐकत नव्हती. उलट ती भांडणात त्याला सांगत होती की, तुम्ही माझ्यावर उगाच संशय घेता माझे कोणाबरोबर कसले ही संबंध नाहीत, हे ती त्याला सांगत होती. परंतु त्याचा तिच्यावर विश्वास राहिलेला नव्हता. रोहिणी ही त्या तरूणाबरोबर संबंध ठेवून आहे. ती त्याच्याबरोबर मजा मारत असते ती आपल्याला धोका देत आहे हे त्याच्या डोकीत जाम बसले होते. त्यामुळे तो तिच्यावर चिडत होता. हल्ली भांडणात ती ही त्याला नको नको ते बोलत होती. त्याला खरे खोटे सुनावत होती. त्यामुळे नवरा बायकोचे एकमेकांशी कधीच पटत नव्हते. वारंवार त्या दोघांची या कारणातून भांडणे होती. बायको सांगून देखील ऐकत नव्हती. त्या तरूणासोबत असलेले तिचे संबंध ही ती तोडयला तयार नव्हती. उलट ती त्याला म्हणत होती की, एक वेळ मी तुम्हाला सोडेन पण त्याला सोडणार नाही, तुम्ही मला काय दिला आहे? तो मला सर्व काही देतो असे सांगत ती त्याच्या वर्मावर बोट ठेवत होती. आता याचा सोक्षमोक्ष काय तो लावलाच पाहिजे असे प्रशांतला वाटत होते. तो दारूच्या नशेत घरात आला की, नवरा बायकोची भांडणे ठरलेली असायची. त्याची भांडणे ही घरादाराला आणि शेजाऱ्यांना तमाशाच झालेली होती. हल्ली प्रशांतचे कामावर ही लक्ष लागत नव्हते. त्याच्या मनात सतत सारखे रोहिणी ही आता त्याच्याबरोबर काय करत असेल असा विचार येत होता. रोहिणीच्या चारित्र्याचा संशय त्याच्या मनात आणि डोक्यात इतका घट्ट बसला होता की, काही केल्या हा विचार त्याच्या मनातून जात नव्हता. त्यांची भांडणे बरीच विकोपाला गेली होती. काही केल्या ती भांडणे मिटत नव्हती. नातेवाईकांनी आणि रोहिणीच्या माहेरच्या लोकांनी ही भांडणे मिटविण्यचा प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना यश आले नव्हते. प्रशांत हा सारखा तिच्याकडे त्याच संशयाने बघत होता. हिचे लफडे काही बंद होत नाही.त्यामुळे हिचा कायमचा काही तरी बंदोबस्त करायला हवा असा विचार तो करीत होता. त्यातच मागे एकदा ती त्या तरूणासोबत प्रशांतला रंगेहात सापडली होती. त्यामुळे आता त्याचा विश्वासच नाही तर त्याच्या मनाची खात्री ही झालेली होती की रोहिणीचे बाहेर त्या तरूणासोबत लफडे चालू आहे. ती काही केल्या त्याच्याबरोबरचे संबंध तोडायला तयार नाही म्हणून त्याने आता वेगळाचा विचार केला. हल्ली ढवळी येथे रोहिणीचे वडिल सारखे आजारी असल्याने रोहिणी ही सारखे वडिलांना बघायला म्हणून वाळवा तालुक्यातील ढवळी येथे जात होती.पण प्रशांतला हे फक्त तिचे निमित्य वाटत होते. कारण ती वडिलांना भेटायच्या नावाखाली प्रियकराला भेटायला त्याच्यासोबत मजा मारायला जात असल्याचा त्याचा संशय येत होता. त्यामुळे तो हल्ली तिच्याबरोबर ढवळी येथे जात होता. आता त्याने तिला मारण्याचा प्लॅन केला. सोमवार दि.२९ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ते दोघे ही ढवळी येथे रोहिणीच्या आजारी वडिलांना भेटायला म्हणून गेले. ढवळी येथे गेल्यावर तसा तो वरून शांत वाटत होता. परंतु त्याच्या मनात वेगळाच विचार येत होता आज कोणत्या परिस्थीतीत रोहिणीचा विषय संपवायचा याचा तो विचार करीत होता. रात्री ७ वाजणेच्या सुमारास ढवळी येथून ते दोघे भादोले येथे परत येण्यासाठी निघाले. गाडीवरच प्रशांतने तिच्याशी या कारणातून वाद घालायला सुरूवात केली. वाद घालत घालत ते दोघे गाडीवरून येत होते. भादोले-कोरेगाव रस्त्यावरील वारणा नदीच्या पुढे आल्यावर त्याने ओढयानजीक आपली गाडी थांबवली.त्यावेळी रात्रीचे ८ वाजत आले असतील रस्त्यावर कुणी नाही याची खात्री करून प्रशांतने गाडी रस्त्याकडेला थांबवली. गाडी थांबवली असता ती गाडीवून खाली उतरली. तो जरा बाजुला गेल्यागत केला.तीचे तोंड चालुच होते. त्याला तिचा राग आला होता. आधीच तो तिला मारण्याच्या हेतूने प्लॅन केला असल्याने तो तयारीनेच आला होता. बाजुला गेलेला प्रशांत रोहिणीच्या जवळ येवून त्याने पुडीतून चटणी काढली आणि ती चटणी तिच्या डोळ्यात फेकली. ती काय झाले म्हणून डोळे चोळत असताना प्रशांतने आपल्याकडील कोयत्याने तिच्या डोक्यात मोठा घाव घातला. तसेच हातोडयाने वार केला. ती वार चुकवत असताना कोयता तिच्या हाताला लागला. त्यात तिची बोटे कापली गेली. ती ओरडत रक्ताच्या थारोळ्यात खाली पडली. परंतु रस्ता सुनसान असल्याने तिच्या ओरडण्याचा काही फायदा झाला नाही. ती खाली पडल्यावर त्याने परत तिच्या डोक्यावर मानेवर हातावर कोयत्याने वार केले. रक्ताच्या थारोळ्यात ती निपचिप पडली. त्यात जागीच मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर तो तसाच गाडीवरून भादोले गावात घरात आला. घरातील लोकांना आणि शेजाऱ्यांना त्याने सांगितले की, मी माझ्या बायकोचा रोहिणीचा खून केला आहे कोरेगाव भादोले रस्त्यावर तिचा मृतदेह पडला आहे. मी तिचा खून केला असून आता पाच सहा महिने मी काय परत भादोले येथे गावात येणार नाही तुम्ही माझ्या मुलीचा सांभाळ करा असे सांगून तो तेथून निघून गेला. त्याने असे सांगितल्यावर घरच्या लोकांनी घटनास्थळी जावून पाहिले असता रोहिणी ही रस्त्याकडेला रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. कुणी तरी या घटनेची माहिती पेठवडगाव पोलीसांना दिल्यावर पोलीस निरी. प्रमोद शिंदे हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी पोहचले. घटनास्थळी रोहिणी ही रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. तर बाजुलाच मोठा हातोडा ही पडलेला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती पोलीसांनी ढवळी येथील रोहिणीच्या माहेरच्या लोकांना दिली. ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळावरून संशयीत प्रशांत पाटील हा पळून गेला होता. घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पोलीसांनी पारगाव येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पळून गेलेल्या प्रशांत पाटील याचा शोध पेठवडगाव पोलीसाबरोबर कोल्हापुर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस घेत होते. घटनेनंतर अवघ्या सहा तासात स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांनी पळून गेलेल्या प्रशांतच्या मुसक्या आवळ्या. त्याला पेठवडगाव पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. पेठवडगाव पोलीस त्याच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना त्याने पोलीसांना सांगितले की, मयत रोहिणी हिच्या चारित्र्यावर संशय असल्याने आणि तिला त्या तरूणासोबत संबंध तोड म्हणून सांगितले होते परंतु ती ते संबंध तोडयला तयार नव्हती. या कारणातून आमची भांडणे झाल्याने मी तिचा ढवळी येथून येताना खून केला. त्याने आपल्या गुन्हयाची कबुली दिल्यावर पोलीसांनी मयत रोहिणीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पेठवडगाव पोलीसांनी रोहिणी प्रशांत पाटील (वय २९) रा.भादोले हिच्या खून प्रकरणी तिचा पती प्रशांत पाटील (वय ३२) रा.भादोले याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला पेठवडगाव येथील कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने प्रशांत पाटील याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी प्रशांत पाटील याच्याकडून गुन्हयात वापरलेली दुचाकी, हातोडा आणि कोयता जप्त केला.या घटनेचा पुढील तपास पेठवडगाव पोलीस ठाण्याचे पो.निरी. प्रमोद शिंदे याच्या मार्गदर्शनाखाली त्याचे सहकारी करीत आहेत.विवाहबाहय संबंधात पतीला पत्नीच्या चारित्र्याचा संशय आला की तो सैरभैर होतो. त्याला यातून काही मार्ग सापडला नाही की तो तिचा खुन करतो आणि खरे तर देखणी बायको दुसऱ्याची असते अशी जी म्हण आहे तेच या विवाहबाहय संबंधात पतीच्या मनात बसलेले असल्याने खूनाच्या घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## संतापलेल्या जन्मदात्याची मती भ्रष्ट ...

घेऊन दोघे घरी परतले. पतीने आपल्या चार महिन्यांच्या बाळाला पाण्याच्या बॅरलमध्ये टाकून राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना गेवराई तालुक्यातील रामनगर येथे शुक्रवारी पहाटे चार वाजता उघडकीस आली. अमोल हौसेराव सोनवणे (वय ३०, रा.रामनगर, ता.गेवराई), असे मयताचे नाव आहे. तालुक्यातील तलवाडा तहत-रामनगर येथील शेतकरी अमोल हौसेराव सोनवणे (वय ३०) याचा पत्नी पायल अमोल सोनवणे हिच्याशी २९ सप्टेंबर २०२५ रोजी कौटुंबिक कारणातून झालेल्या भांडणातून दोघांनी रागाच्या भरात विष घेतले. ग्रामस्थांनी दोघांना उपचारासाठी खाजगी रुग्णालयात दाखल केले होते. उपचारानंतर रुग्णालयातून सुटी मिळाल्यांनतर २ ऑक्टोबरला दसऱ्याच्या दिवशी दोघे घरी परतले. शुक्रवारी पहाटे चार वाजता झोपेतून उठत अमोलने त्याच्या चार महिन्यांच्या मुलास घरातील पाण्याच्या बॅरलमध्ये टाकले. नाकातोंड्यात पाणी गेल्याने काही वेळातच मुलाचा बुडून मृत्यू झाला. त्यांनतर अमोलने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. शुक्रवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यांनतर नातेवाइकांनी तलवाडा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही. दुपारी तीन वाजता गावात अंत्यसंस्कार अमोल सोनवणे याच्या मृतदेहाचे तलवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. त्यांनतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. दुपारी तीन वाजता रामनगर येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अमोल सोनवणे याला गावात पाच एकर शेती असून त्याच्या पश्चात आई-वडील, दोन विवाहित बहिणी, पत्नी, असा परिवार आहे.

# साखरझोपेत विषारी सापाचा चावा, चिमुरडीचा अंगात विष भिनल्याने मृत्यू, पाठोपाठ मावशीनेही प्राण सोडले!



**कल्याण : वार्ताहर**

डोंबिवलीतील खंबाळपाडा परिसरात एक हृदयद्रावक घटना घडली आहे. झोपेत असताना सर्पदंश झाल्याने प्राणवी भोईर (वय ३) या चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. विशेष म्हणजे, तिच्यासोबत झोपलेल्या मावशीलाही साप चावल्याचे निदर्शनास आले होते. आता मावशीचा देखील उपचारादरम्यान मृत्यू झाल्याचे समोर येत आहे. ही दुर्दैवी घटना डोंबिवलीच्या आजदे गावात घडली. प्राणवी तिची मावशी श्रुती ठाकूरसोबत झोपली होती. झोपेत असताना सापाने चावा घेतल्याने प्राणवी अचानक जोरजोरात रडू लागली, मात्र सुरुवातीला काय घडलंय हे कळत नव्हतं. तिच्या आईकडे दिल्यानंतर काही वेळात श्रुतीलाही साप चावल्याचं लक्षात आलं. तेव्हाच प्राणवीवरही सर्पदंश झाल्याचा संशय पक्का झाला. तत्काळ दोघींनाही डोंबिवलीतील केडीएमसीच्या शास्त्रीनगर रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी सुरुवातीला दोघींची तब्येत स्थिर असल्याचे सांगितले. मात्र, काही वेळात प्राणवीची प्रकृती बिघडली, आणि तिला ठाण्यातील सिव्हिल रुग्णालयात हलवण्यात आले. दुर्दैवाने, तेथेच तिचा मृत्यू झाला. श्रुती ठाकूरवर एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, काल रात्री उशिरा तिचीही प्राणज्योत मालवली. अवघ्या २४ वर्षांची तरुणी आणि तिची ३ वर्षांची भाची अशा दोघींच्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या दुहेरी मृत्यूनंतर नातेवाईक आणि स्थानिक नागरिकांनी केडीएमसीच्या रुग्णालयावर गंभीर आरोप केले आहेत. सर्पदंशावर योग्य उपचार न दिल्यामुळे, वेळेत अँटी-स्नेक डोस न दिल्यामुळे आणि आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्यामुळे दोघींचा मृत्यू झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्राणवीच्या मृत्यूनंतरही श्रुतीवर आवश्यक त्या प्राथमिक वैद्यकीय उपचारांमध्ये हलगर्जीपणा झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला. यानंतर संतप्त कुटुंबीयांनी मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांच्या कार्यालयात जाऊन जाब विचारला आणि जबाबदार डॉक्टरांवर कारवाई करण्याची लेखी मागणी केली. या प्रकरणावर केडीएमसीच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपा शुक्ल यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, दोन्ही रुग्णांवर सर्पदंशावरील उपचार करण्यात आले. अँटी व्हेनम इंजेक्शन देण्यात आलं होतं. मात्र, प्रकृती बिघडल्यामुळे पुढील उपचारासाठी प्राणवीला ठाण्यात हलवण्यात आलं. नातेवाईकांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली जाईल. याबाबत योग्य ती कारवाई केली जाईल, असे त्यांनी म्हटले आहे.

# निराधार मजुर व शेतकरी यांच्या न्याय हक्कासाठी मंगळवारी तहसील कार्यालयावर जनअक्रोश मोर्चा

**देवणी : वार्ताहर**




देवणी तालुक्यातील विविध सामाजिक संघटनेच्या वतीने तहसील कार्यासमोर मंगळवार रोजी दि.७ ऑक्टोबर २०२५ रोजी ठिक १०. वा. तहसिल कार्यालय, देवणी येथे हजारोच्या संख्येने उपस्थित राहून आपल्या न्याय हक्कासाठी सरकाच्या विरोधात आंदोलन करुन गोरगरीब जनतेच्या मागण्या पुर्ण करुन घेण्यासाठी तहसिल, कार्यालय, देवणी येथे जनअक्रोश महामोर्चा काढण्यात येणार आहे. संगायो, इंगायो, श्रावणबाळ योजना या सर्व योजनांचे अनुदान १५०० रु. प्रमाणे वाटप करण्यात येत आहे पण सदरची महागाई. पाहता औषध गोळयाच्या किंमत हया मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे वयोवृध्द लाभार्थ्यांना हे अनुदान तुटपुंजे पडत आहे. तरी शासनाने सदरील अनुदान १५०० रु. वरुन ५००० रु. वाढविण्यात यावे, संगायो, इंगायो, श्रावणबाळ योजनेअंतर्गत चालू असेलले योजना शासनाच्या जाचक अटीमुळे त्या बंद होत आहेत, तरी शासनाने सदरच्या जाचक अटी रद्द करून लाभार्थ्यांना सुलभ प्रमाणत लाभ मिळेल असे निकष वापरावेत, संगायो, इंगायो, श्रावणबाळ योजनेतील लाभार्थ्याचे वय शासनाने ६५ वर्षाच्या वर ठरविले आहे पण सदरील मानवाचे आर्युमान कमी झाल्यामुळे सदरील योजनेचे वय ६५ वय ५५ वर्ष करण्यात यावे दिनांक १०/१०/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मंजुर लाभार्थ्याचे अनुदान तहसीलच्या हलगर्जी पणामुळे बँक खात्यात जमा झाले नाही, त्वरीत त्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात यावे, महाराष्ट्रातील सर्व शेतमजुरांना सन्मान निधी ही योजना लागु करण्यात यावी. व त्या योजनेमार्फत प्रत्येक मजुरांना ५००० रु. एवढे अनुदान मंजुर करण्यात यावे. महाराष्ट्रातील अतिवृष्टीमुळे पिकाचे १०० टक्के नुकसान झालेले आहे. तरी सर्व शेतकऱ्यांना सरसकट प्रति हेक्टरी ५०,००० रु. एवढे अनुदान मंजुर करण्यात यावे, शासनाच्या वतीने पुरवठा विभागा मार्फत प्रतिव्यक्ती ५ किलो धान्य वाटप करण्यात येत आहे. तरी हे धान्य सद्या परिस्थितीला पुरेशे होत नाही. तरी शासनाने प्रतिव्यक्ती १० किलो धान्य देण्याचे मंजुर करावे. बांधकाम मजुरांची शासन नोंद करुन घेत आहे. यातील जाचक अटी रद्द करून शेतमजुर किंवा इतर कामगार यांची नोंद सरसकटपणे मजुर म्हणून नोंद करुन घेण्यात यावी. वरील सर्व मागण्यांचा शासनाने विचार करून सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी मागणी इंडिया पँथर्चे संस्थापक अध्यक्ष बालाजी बनसोडे तळेगावकर, श्रमिक हक्क अभियानाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भाऊ सुर्यवंशी, उपेक्षितांचे नेते वसंत बिबिनवरे, संजय बिरादार, गोकुळ दंतराव धनेगाव, संजय सुर्यवंशी हेळंब, कोमल मिरगाजी भोपणी,बालाजी गायकवाड बोंबळीखु, माधव बेंजरगे हिसामनगर, राहूल श्रीवास्तव हिसामनगर, मधुकर माकने सय्यदपूर, हरिश्चद्र पांचाळ धनेगाव ,माधव सुर्यवंशी टाकळी व शिरिष होळकर जवळगा, मानवी हक्क अभियान संघटनेचे देवणी तालुकाध्यक्ष डी.एन कांबळे हंचनाळ, गोविंद दंडे तळेगाव भो,नवाज शेख चवणहिप्परगा, तानाजी कांबळे सिंधीकामठ, विजयकुमार सुर्यवशी, संदीप सुर्यवंशी नेकानाळ आदींनी निवेदनाद्वरे मागणी केली आहे,तरी या मोर्चात जास्तीत जास्त संख्येने निराधार, मजूर शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन विविध सामाजिक संघटनेच्या वतीनेकरण्यात आले आहे.

# गावठी दारू अड्ड्यावर पोलिसांच्या धाडी; २ लाख ९६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



**लातूर : वार्ताहर**

जिल्हा पोलीस दलाने अवैध धंद्या विरोधात सुरू केलेल्या मोहिमेअंतर्गत जिल्हाभरातील विविध ठिकाणी चोरून सुरू असलेल्या अवैध गावठी दारू अड्ड्यावर पोलिसांनी धाडी मारून सुमारे २ लाख ९६ हजार रुपये चा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत जिल्हाभरात ६२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. लातूर जिल्ह्यातील अवैध धंद्यावर प्रभावी कारवाई करण्यासाठी पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशाने विशेष मोहीम राबवून अवैध धंद्यावर कार्यवाही करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे अचानक मासरेडचे आयोजन करून लातूर जिल्ह्यातील लपून-छपून हातभट्टी तयार करणाऱ्या व्यक्ती आणि ठिकाणावर लातूर पोलिसांकडून प्रभावी कारवाई करत हातभट्टी दारू तयार करणारे, देशी-विदेशी दारूची अवैध विक्री व्यवसाय करणाऱ्या ६३ लोकांवर ६२ गुन्हे दाखल करून ०२ लाख ९६ हजार ७१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करून हातभट्टी दारू आणि हातभट्टीचे रसायन मुद्देमाल नष्ट करण्यात आला आहे. अवैध धंद्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्यातील ३६ पोलीस अधिकारी, १६१ पोलीस अमलदारांचे विशेष पथके बनवून राबविण्यात आलेल्या मासरेडमध्ये लातूर जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीमधील दुर्गम भागात लपून- छपून हातभट्टी तयार करून त्याची साठवणूक व विक्री करणाऱ्यावर तसेच देशी-विदेशी मद्याची अवैद्य विक्री व्यवसाय करणारे ६३ इसमावर ६२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये हातभट्टी, हातभट्टीचे रसायन नष्ट करण्यात आले आहे. अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी लातूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे सूचना व मार्गदर्शनात लातूर पोलिसा कडून अवैध धंद्याविरुद्ध जोरदार कारवाई करण्यात येत असून सदरची कारवाई यापुढेही सुरूच राहणार आहे.

# वसईतील शिक्षिकेने केला पोलीस विद्यार्थ्यांचा सन्मान!



**वसई : वार्ताहर**

मुंबई महापालिका शाळेच्या माजी शिक्षिका व वसई, सागरशेत रोड येथे राहणाऱ्या सौ. लीना रॉड्रिग्ज यांनी मुंबई पोलिसांच्या गुन्हा अन्वेषण विभागात पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत असलेला आपला विद्यार्थी प्रभाकर तांबे यांच्या सोमवारी झालेल्या सेवानिवृत्त समारंभास उपस्थित राहून त्याचा खास सत्कार केला. त्यास सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे अन्वेषण) शैलेश बलकवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला अनेक पोलीस कर्मचारी तसेच श्री. तांबे यांचे कुटुंबीय उपस्थित होते. एक शिक्षका आपल्या विद्यार्थ्याच्या सेवनिवृत्ती कार्यक्रमास उपस्थित राहून त्याचा सत्कार करीत आहे, ही अत्यंत दुर्मिळ व कौतुकास्पद घटना आहे, असे अप्पर पोलीस आयुक्त बलकवडे यांनी आपल्या भाषणात सांगितले.

# सेवा पंधरवडा निमित्त कंचाड येथे विकास उपक्रमांचा शुभारंभ




**वाडा : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा निमित्त वाडा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, कंचाड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सेवा पंधरवडा निमित्त विविध उपक्रमाचे आयोजन, आदी कर्मयोगी सेवा केंद्राचे उद्घाटन कंचाड येथे करण्यात आले. पात्र कुटुंबांना अतिक्रमित रहिवासी जागांचे हक्कपत्रे वाटप करण्यात आले. शाळा तिथे दाखला अभियानांतर्गत प्रातिनिधिक दाखल्यांचे वाटप झाले. मान्यवरांनी नवीन घरकुल बांधकाम व रस्ते सीमांकनाची पाहणी केली. अंभई येथे शेत रस्ता पाहणी व सीमांकन मोजणी करताना शेतकऱ्यांशी संवाद साधला. पीएम जनमन योजनेअंतर्गत कातकरी बांधवांच्या घरकुल गृहप्रवेशास मान्यवरांनी उपस्थिती दर्शवून कातकरी समाजाशी स्नेहसंवाद साधला. मौजे हमरापूर येथे समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत बचत गटांच्या विविध उत्पादनांच्या प्रदर्शनाला मान्यवरांनी भेट दिली व महिला गटांच्या कार्याचे कौतुक केले. या उपक्रमांमुळे नागरिकांना शासकीय योजनांचा थेट लाभ मिळत असून, जिल्ह्यातील शिक्षण, निवास, पायाभूत सुविधा व ग्रामविकास क्षेत्रात सकारात्मक बदल घडून येत असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले. या प्रसंगी खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार हरिश्चंद्र भोये, विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, भाऊसाहेब फटांगरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर मधील पथदिवे बंद शेलार ग्रामपंचायतीच दुर्लक्ष



**भिवंडी : वार्ताहर**

शहरा लगत असलेल्या शेलार ग्रामपंचायत हद्दीतील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगरमध्ये लाखो रुपये खर्च करून लावण्यात आलेले हाय मस्ट व अनेक पथदिवे बंद असल्याने या ठिकाणी नवरात्रीच्या सणासुदीच्या काळातच अंधार पसरला आहे.यामुळे स्थानिकांचा हिरमोड झाला असून रात्रीच्या अंधारात महिलांना प्रवास करण्यासाठी भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्याचबरोबर या भागात असलेले अनेक सीसीटीव्ही बंद असल्याने चोरीच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता सुद्धा वाढली आहे. ग्रामपंचायतीकडे या बाबत अनेकदा तक्रार करूनही या ठिकाणी ग्रामपंचायत प्रशासना कडून कुठल्याही प्रकारची दुरुस्ती न झाल्याने नागरिकां मधून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे. या भागातील सर्व हाय मास्ट पथदिवे बंद पडल्याने अंधारमय परिस्थिती निर्माण झाली आहे. काही दिवसांवर दिवाळी हा प्रकाशाचा सण येऊन ठेपला आहे त्यामुळे या ठिकाणी असलेले सर्व पथदिवे तातडीने दुरुस्त करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

# पालघर जिल्ह्यातील ४८ विशेष शिक्षक कायम

## समावेशित शिक्षण उपक्रमाला गती; दिव्यांग विद्यार्थ्यांना मिळणार सातत्यपूर्ण शिक्षण!

**पालघर : वार्ताहर**

सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. १३२/२०१६ मधील निर्देश आणि शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा ८ ऑक्टोबर २०२४ रोजीचा शासन निर्णय यानुसार पालघर जिल्ह्यातील कंत्राटी विशेष शिक्षकांना कायमस्वरूपी पदावर नियुक्ती देण्याबाबत मान्यता दिली होती, त्या अनुषंगाने जिल्हा परिषद पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या हस्ते आज एकूण ४८ विशेष शिक्षकांना कायमस्वरूपी नियुक्तीचे आदेश देण्यात आले. यात जिल्हा परिषद पालघर कार्यक्षेत्रातील ४०, बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत ०७ व विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई यांचे कार्यालय अंतर्गत ०१ असे शिक्षक समाविष्ट आहेत. सन २००४ पासून समग्र शिक्षा अभियानांतर्गत (सर्व शिक्षा अभियान) विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी समावेशित शिक्षण उपक्रम राबविला जात आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, वैद्यकीय व सामाजिक गरजांची पूर्तता व्हावी म्हणून कंत्राटी तत्त्वावर विशेष शिक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.



सुरुवातीला मानधन तत्त्वावर कार्यरत असलेले हे शिक्षक आता शासनाच्या निर्णयानुसार कायमस्वरूपी पदावर कार्यरत राहणार आहेत. पालघर जिल्ह्यातील आठ तालुक्यांतील १५० केंद्रशाळांपैकी ४८ केंद्रशाळांवर विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे. यामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण, दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार असून समावेशित शिक्षण उपक्रमाला नवी उभारी मिळाली आहे. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी विशेष शिक्षकांचे अभिनंदन करून भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी समावेशित शिक्षण उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. विशेष शिक्षकांची कायमस्वरूपी नेमणूक ही या उपक्रमाला नवे बळ देणारी ठरेल. यामुळे जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्र अधिक सक्षम व सर्वसमावेशक होईल, असा मला विश्वास आहे. विशेष शिक्षकांनी आपली जबाबदारी निष्ठा, संवेदनशीलता व आत्मीयतेने पार पाडावी, ही अपेक्षा आहे. असे प्रतिपादन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी केले.

# गांधी जयंतीनिमित्त वाचनालयात कार्यक्रम



**वाडा : वार्ताहर**

२ ऑक्टोबर गांधी जयंतीनिमित्त वाड्यातील महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शक भाषणातून गांधीजींचे विचार मांडले. उपस्थित विद्यार्थ्यांनी भाषणातून महात्मा गांधींचे जीवन आणि कार्य उलगडून दाखवले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. वाचनालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमाला शिक्षक, विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष निलेश गंधे व उपाध्यक्ष युवराज ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यवाहक मधुकर गायकवाड, सदस्य सुशील पातकर, डॉ.संजय खत्री यांच्यासह वाचक लक्ष्मण पाटील, उमेश सातपुते कुमार छात्रालयाच्या अधीक्षिका शोभना जाधव उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाळ सूर्यवंशी यांनी केले. ग्रंथपाल सुनील भोवर, सहाय्यक ग्रंथपाल भारती कराळे, लिपिक गायत्री भोईर, शिपाई दीपाली गोसावी यांनी कार्यक्रम यशस्वीते साठी प्रयत्न केले.

# डहाणू खाडी येथे किरकोळ वादातून तरुणाची आत्महत्या

**डहाणू : वार्ताहर**

डहाणू तालुक्यातील डहाणू खाडी येथील एका तरुणाने घरी झालेल्या किरकोळ वादातून समुद्र खाडीत उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शुक्रवार २६ सप्टेंबर रोजी तरुणाने समुद्रात उडी मारली असून त्याचा मृतदेह रविवार २८ सप्टेंबर रोजी चिंचपाडा येथील समुद्रकिनाऱ्यावर आढळून आला. अविनाश मच्छी (२६) हा तरुण शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास घरी झालेल्या किरकोळ वादानंतर रागाच्या भरात घरातून निघाला होता. तो परतला नसून त्याची दुचाकी डहाणू खाडी पुलावर आढळून आली. त्यानंतर कुटुंबाने पोलिसात धाव घेतली असून त्याचा शोध सुरू केला. घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी नसल्यामुळे त्याने आत्महत्या केली की तो कुठे निघून गेला याविषयी संभ्रम निर्माण झाला होता. दरम्यान पोलिसांनी कसून शोध घेऊनही त्याचा थांगपत्ता लागला नाही. रविवारी संध्याकाळच्या सुमारास डहाणू खाडी येथील चिंचपाडा परिसरात अविनाशचा मृतदेह आढळून आला आहे. मृतदेह परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मृतदेह ताब्यात घेतला असून याप्रकरणी वाणगाव पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. परिसरात याबाबत हळहळ व्यक्त होत आहे.

# भिवंडी अंबाडी दरम्यान बसला अपघात; प्रवाशी सुखरूप

**वाडा : वार्ताहर**

भिवंडी वाडा महामार्गावरील अपघातांचे सत्र काही संपेना. शुक्रवारी संध्याकाळी पाच वाजेच्या सुमारास भिवंडी आगारची बस अंबाडीच्या दिशेने जात असताना साई गावाच्या हद्दीत एका बाजूचे रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे तर दुसरी बाजू खोदून ठेवली असल्याने बसचे पुढचा चाक आणि मागचे दोन्ही चाके खाली गेल्याने बस तिरपी झाली होती, सुदैवाने सर्व प्रवाशांना तत्परतेने खाली उतरवल्याने कोणालाही दुखपत झाली नाही. याचे कारण एक तर एसटी बसचे वेळेवर मेन्टनेस होत नाही तर दुसरीकडे रस्तावरी खड्या बस चालकाला आपल्या जिव मुठ्ठीत घेऊन बस चालवतो. यामुळे अपघातात वाढ होत आहे.



06 TO 12 OCTOBER 2025 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 10/4/2025 8:24 PM Page 1



# जातीय आरक्षण आणखी एका फाळणीचे संकेत!

समाजातील गरीब आणि उपेक्षितांना स्वतःच्या पायावर उभे करून त्यांना समाजाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेत आरक्षणाची तरतूद करून ठेवली आहे.पण इथल्या राजकीय पक्षांनी आरक्षणाला जाती पा कुंपणात अडकवून आरक्षणाच्या मूळ उद्देशालाच डांबर फासले. त्यामुळे आज आरक्षण म्हणजे देशाच्या ऐक्याच्या गळ्याला लागलेला फास बनले आहे. मराठा आणि कुणबी हे एकच आहेत असे विचित्र गणित मांडून मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचे काम सुरू आहे त्यामुळे मराठा समाज कुणबी म्हणून आरक्षणास पात्र ठरतोय परिणामी ओबीसी मध्ये लाभार्थ्यांची संख्या वाढते. परिणामी ओबीसी समाजात अस्वस्थता पसरली आहे.पण हा अन्याय दूर करण्यासाठी एकत्र येण्याएवजी ओबीसी नेत्यांमध्ये फूट पडल्याचे दिसत आहे. भुजबळ किती जरी सांगत असले की मराठ्यांना कुणबी समाजातून आरक्षण देऊ देणार नाही. तरी तायवाडे आणि राठोड यांच्यासारखे ओबीसी नेते मात्र विरोध करताना दिसत नाही मराठ्यांना कुणबी समाजातून आरक्षण दिल्याने कुणबी समाजाला काही फरक पडणार नाही अशा प्रकारची भाषा काही कुणबी नेते बोलत असल्याने कुणबी नेतृत्वात सध्या फूट पडलेली आहे आणि हीच फूट कुणबी समाजाच्या मुलावर उठणारी आहे. आरक्षणा मुद्यावरून माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. मराठा-कुणबी एकच असल्याचं दाखवून त्यांना वेगळं आरक्षण द्यायला हवं होतं. मात्र मंत्री छगन भुजबळ यांच्या चुकीमुळेच ओबीसींचं आरक्षण धोक्यात आलं आहे. सरकारने काढलेल्या नव्या जीआरमुळे ओबीसी आरक्षणाला धक्का बसला आहे. भुजबळ हे मंत्रिमंडळात आहेत. पण त्यांनी आता घाबरून न जाता राजीनामा द्यावा आणि जेलमध्ये जाऊन ते शहीद झाले पाहिजे, आम्ही त्यांचा पुतळा उभारू, इतर महापुरुषांपर्यंत त्यांचे फोटो लावू, असं हरिभाऊ राठोड यांनी म्हटलं आहे. नांदेडमध्ये बंजारा समाजाच्या वतीने एसटी प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला. यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना हरिभाऊ राठोड यांनी हे वादग्रस्त विधान केले. मराठा आरक्षण जीआरमुळे मुख्यमंत्र्याची खुर्ची धोक्यात आल्याचंही यावेळी राठोड म्हणाले. हरिभाऊ राठोड पुढे म्हणाले की, ओबीसीच्या यादीत ४२५ जातींचा समावेश आहे. त्यापैकी फक्त कुणबी ही एक जात म्हणत आहे की शासनाने काढलेला जीआर बरोबर आहे. मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र दिले जात आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत मराठा समाज कुणबी प्रमाणपत्र वापरून ओबीसी म्हणून फॉर्म भरतील, आम्ही काहीही करू शकणार नाही. आरक्षणामुळे बंजारा समाजाचा आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सरपंच आणि सदस्य होणार नाही. छगन भुजबळ यांना आरक्षणाचं काहीच कळत नाही. त्यांना फॉर्म्युला देखील माहिती नाही. त्यांच्या चुकीमुळे ओबीसीचं आरक्षण धोक्यात आलं आहे. तेव्हा त्यांनी ताबडतोब आपल्या पदाचा राजीनामा देऊन न घाबरता जेलमध्ये जायला पाहिजे आणि शहीद झाले पाहिजे, असं वक्तव्य राठोड यांनी केलं. मराठा आरक्षणावरून हरिभाऊ राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली. मराठा आरक्षण जीआरमुळे फडणवीस यांना वाटतं नसलं तरी ओबीसी आरक्षणाला धक्का बसला आहे. फडणवीस यांनी आरक्षण प्रश्नाची चुकीच्या पद्धतीने हाताळणी केली आहे. जीआरमधून त्यांनी ओबीसी समाजाला अंगावर घेतले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्याची खुर्ची जाण्याची वेळ आली आहे, असा दावा हरिभाऊ राठोड यांनी केला. बंजारा समाज आता जागरूक झाला आहे. बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात समावेश करण्याच्या मागणीसाठी आगामी दिवसात मुंबईलाही मोर्चा काढणार असल्याचे राठोड म्हणाले. आता राठोड आणि भुजबळ किंवा भुजबळ आणि तायवाडे यांची परस्पर विरोधी भूमिका कुणबी समाजाचे नुकसान करणारी आहे.त्यातच आता आदिवासींना एसटी प्रवर्गातून आरक्षण हवे आहे. .तर अनुसूचित जातीच्या आरक्षणाबद्दल लक्ष्मण हाके सारखे लोक विरोधात बोलू लागले आहेत त्यामुळे आरक्षणाचा आणखी विचका होणार आहे आणि यात सर्वाधिक नुकसान कुणबी समाजाचे होणार आहे. त्यामुळे कुणबी समाज आक्रमक झाला आहे.अशावेळी मराठा आणि कुणबी एकमेकांचा समोर आले तर भयंकर संघर्ष घडू शकतो. त्यातच आता इतरही छोट्या छोट्या जाती आरक्षण मागत आहेत. आरक्षण मागणे हा गुन्हा नाही पांडुअर्याच्या ताटातलवमागणे हा गुन्हा आहे. त्यामुळे जातीपातीत संघर्ष निर्माण होऊ शकतो. अगोदरच भारतात खंडीभर जाती आहे यातील प्रत्येक जातीच्या लोकांनी दुसऱ्या जातीला दिलेल्या आरक्षणातून आरक्षण मागितले तर संघर्ष पेटणार नाही का? मराठ्यांना कुणबी समाजाच्या आरक्षणातून दिलेले आरक्षण सरकारला इतकेवभरी पडणार आहे की त्यातून उभा राहणार संघर्ष आणखी एका फाळणीचे बीज रोवले गेले आहे.

# राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सार्ध शताब्दी महोत्सवाच्या 'वंदे मातरम' गीताच्या बोधचिन्हाचे अनावरण

## मंत्री मंगलप्रभात लोढा व आशिष शेलार यांची संयुक्त संकल्पना



**मुंबई : वार्ताहर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रालयात सार्ध शताब्दी महोत्सवाच्या 'वंदे मातरम' गीताच्या बोधचिन्हाचे अनावरण करण्यात आले. देशभक्ती आणि राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक असलेल्या 'वंदे मातरम' गीताला ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्ष पूर्ण होत आहेत. या अनुषंगाने सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा व यांच्या संयुक्त संकल्पनेतून राज्यात सार्ध शताब्दी महोत्सव साजरा करण्यात येत आहे. राज्यभरात सार्ध शताब्दी महोत्सव समितीच्या माध्यमाने देशभक्तीवर विविध कार्यक्रम होणार असून यात प्रामुख्याने 'वंदे मातरम' गीताचे प्रत्येक तालुक्यात समूहगान होणार आहे.

'वंदे मातरम' बोधचिन्हाच्या अनावरण प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, कामगार मंत्री आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, सार्वजनिक बांधकाम मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह कौशल्य विभागाच्या अप्पर मुख्य सचिव मनीषा वर्मा उपस्थित होत्या. या महोत्सवाच्या अधिकृत लोगो करिता कौशल्य विभागाच्या अंतर्गत बोधचिन्ह डिझाईन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. थोर कवी आणि तत्वज्ञ बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी १८७५ साली लिहिलेल्या 'वंदे मातरम' या भारतमातेच्या राष्ट्रगीताला येत्या ७ नोव्हेंबर रोजी १५० वर्ष पूर्ण होत असल्याने कौशल्य विकास मंत्री श्री.मंगलप्रभात लोढा आणि सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. यासंदर्भात मंत्री लोढा म्हणाले की, वंदे मातरम गीताला ऐतिहासिक पार्श्वभूमी असून देशप्रेम निर्माण करण्याचे सामर्थ्य या गीतात आहे. भारतमातेच्या या राष्ट्रगीताचा गौरव जनतेच्या उत्फुर्त सहभागाने झाला पाहिजे. त्यामुळेच या महोत्सवासाठी जनतेच्या सहभागातून बोधचिन्हाची निवड करण्यात आली आहे. ५ ते १० सप्टेंबर दरम्यान ऑनलाईन झालेल्या या बोधचिन्ह डिझाईन स्पर्धेत राज्यातल्या ३५० स्पर्धकांनी भाग घेतला होता. मुंबईतील जे. जे. कला महाविद्यालयातील तज्ञ परीक्षकांनी पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयाचे प्राध्यापक रवी पवार यांनी डिझाईन केलेल्या आकर्षक आणि कलात्मक बोधचिन्हाची निवड केली आहे. देशभक्ती जागृत करणाऱ्या सार्ध शताब्दी महोत्सवात सर्वानी सहभाग घ्यावा असे आवाहन मंत्री लोढा आणि शेलार यांनी जनतेला केले आहे. राज्यातील कौशल्य विद्यापीठ, आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र, शासकीय आणि खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 'वंदे मातरम'च्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमांचं आयोजन केलं जाईल.तसेच सांस्कृतिक विभागाकडूनही राज्यातील ग्रामीण भागातही सार्ध शताब्धी महोत्सव साजरा होणार आहे. त्यासंदर्भात शासकीय आणि अशासकीय सदस्यांची समितीही स्थापन करण्यात आलीय. प्रतिष्ठित व्यक्तींचा त्यात समावेश करण्यात आला आहे, अशी माहितीही कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार -पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले

**लातूर : वार्ताहर**

जिल्ह्यात यंदा सर्वच तालुक्यांमध्ये अतिवृष्टीने शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना जास्तीत जस्त नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार अमित विलासराव देशमुख, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे गतीने सुरु आहेत. पंचनामे पूर्ण होताच याबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येईल. नुकसानग्रस्त सर्वच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यसाठी प्रयत्न करणार असल्याचे पालकमंत्री श्री. भोसले यावेळी म्हणाले. लातूर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीवर तोडगा काढण्याच्या सूचना यापूर्वीच दिल्या आहेत. त्यानुसार सुचविण्यात आलेल्या उपाययोजनांनुसार पर्यायी मार्गाच्या आवश्यक कामाचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या. महावितरणची जिल्ह्यात सुरु असलेली कामे अपेक्षित गतीने होत नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संथगतीने कामे करणाऱ्या ठेकादारांवर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव महावितरणच्या मुख्य कार्यालयास सादर करावा. तसेच जिल्ह्यात रोहित्र दुरुस्ती अथवा विद्युत वाहिन्यांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण होणे आवश्यक आहे. महावितरणचे अधिकारी, कर्मचारी यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेवून त्याचा तातडीने निपटारा करावा, अशा सूचना पालकमंत्री श्री. भोसले यांनी दिल्या. नव्याने मंजूर झालेल्या विद्युत उपकेंद्रांची कामे तातडीने सुरु करावीत. ज्या उपकेंद्रांना जागा उपलब्ध नाही, अशा उपकेंद्रांना जागा उपलब्ध करून देण्याबाबत महावितरणने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. जिल्ह्यात गाव तिथे स्मशानभूमी या संकल्पनेतून प्रत्येक गावात स्मशानभूमी उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध असलेल्या गावांमध्ये स्मशानभूमी शेड उभारणी, परिसरात बाकडे, पाणी आदी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. या सुविधा निर्मितीसाठी स्मशानभूमी उभारणीसाठी प्रत्येक गावाला सुमारे ८ ऐवजी १० लाख रुपये देण्यात येतील. तसेच ज्या गावांमध्ये स्मशानभूमीसाठी शासकीय जमीन उपलब्ध नाही, अशा गावांमध्ये भूसंपादनासाठी पहिल्या टप्प्यात ५ कोटी रुपयांची तरतूद करण्याला पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मंजुरी देण्यात आली.जिल्हा परिषदेच्या जुन्या शाळांच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे. त्यामुळे जिल्हा वार्षिक योजनेतून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून दिला जाईल. यासोबतच राज्य शासनाकडूनही या कामासाठी निधी मिळविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे पालकमंत्री श्री. भोसले म्हणाले. तसेच अतिवृष्टीमुळे खराब झालेल्या रस्त्यांची दुरुस्ती, लघुपाटबंधाऱ्यांची डागडुजी, रोगराईवर नियंत्रण ठेवण्यासाठी आरोग्य संस्थांना पुरेसा औषधसाठा निर्माण करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी यावेळी जलजीवन मिशन योजनेंतर्गत कामांचे आराखडे प्रलंबित असल्याचे सांगून या कामांना गती देण्याची सूचना केली. तसेच जिल्ह्यात सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करावे, असे सांगितले. राज्यातील सर्वात कमी वनक्षेत्र असलेल्या लातूर जिल्ह्यात वन विभागाने प्रभावी वृक्ष लागवड मोहीम राबवून वृक्ष संवर्धनासाठी विशेष खबरदारी घ्यावी. यासोबतच कृषी विभागाने जिल्ह्यात जलसंधारणाची कामे करण्याला प्राधान्य देण्याच्या सूचना खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी केल्या. जिल्ह्यात मंजूर झालेल्या विद्युत उपकेंद्रांना जागा उपलब्ध करून दिली जावी. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करून जास्तीत जास्त मदत शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली जावी, असे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सांगितले. जिल्ह्यात नवीन विद्युत वाहिनीची कामे सुरु असून यासाठी विद्युत खांब उभारणीची कामे नित्कृष्ट दर्जाची होत आहेत. तसेच हे खांब रस्त्यापासून जवळच उभारण्यात येत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही, असे आमदार संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले.

# देवस्थानच्या शेतजमिनींचे मॅपिंग करुन जिल्हानिहाय याद्या तयार करा; ॲड.आशिष जयस्वाल यांचे निर्देश



**मुंबई : वार्ताहर**

राज्यामध्ये देवस्थानच्या शेतजमिनी आहेत. या जमिनी हडपण्याच्या बऱ्याच तक्रारी येत आहे. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी देवस्थानच्या जमीन शेतजमिनींचे मॅपिंग करून त्याच्या जिल्हा निहाय याद्या तयार कराव्यात असे निर्देश विधि व न्याय राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी मंत्रालयात आयोजित बैठकीत दिले. बैठकीस विधि व न्याय विभागाच्या अवर सचिव मनीषा कदम, महाराष्ट्र मंदिर महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते. राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल म्हणाले, देवस्थानच्या शेतजमिनी बाबत संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पोर्टलवर माहिती घेण्यात यावी जिल्हाधिकारी कार्यालयात या विषयासाठी उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. अतिक्रमित तसेच हडपलेल्या देवस्थानच्या शेतजमिनी मोकळ्या करण्यात याव्यात. देवस्थानच्या शेत जमिनींबाबत झालेल्या व्यवहाराची धर्मादाय आयुक्तांच्या माध्यमातून चौकशी करण्यात यावी. देवस्थान जमिनीच्या ७/१२ वर चुकीच्या नोंदणी करण्यात आल्या असल्याच्या तक्रारींच्या अनुषंगाने धर्मदाय आयुक्त यांनी तपासणी करावी. तपासणीचा अहवाल सादर करावा. देवस्थान शेत जमिनी बाबत अवैधरित्या झालेला फेरफार हा अवैधच मानला जाईल. अशा फेरफारची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असेही विधि व राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी सांगितले. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यात २४५ देवस्थाने आहेत ही देवस्थाने समितीच्या कार्यक्षेत्रातून उघडण्याबाबत पडताळून कार्यवाही करण्यात यावी, असेही विधि व न्याय राज्यमंत्री ड जयस्वाल यांनी निर्देशित केले.

# नागपूर ते चंद्रपूर २०४ किलोमीटर लांबीच्या द्रुतगती महामार्गाला मान्यता

## भविष्यात रस्ता बनविताना परिसरात विकासाची 'इकोसिस्टीम' निर्माण करा - मुख्यमंत्री

**मुंबई : वार्ताहर**

नागपूर ते चंद्रपूर या २०४ किलोमीटर लांबी असलेल्या चार पदरी सिमेंट काँक्रीट महामार्गाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवासस्थानी झालेल्या मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. तसेच चंद्रपूर ते मूल दरम्यान महामार्ग निर्मितीचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, भविष्यामध्ये कुठलाही रस्ता बांधताना रस्त्याच्या परिसरात विकासाची 'इकोसिस्टीम' निर्माण करण्यात यावी. त्यासाठी आधीपासूनच भूसंपादन करून नियोजन करण्याचे निर्देशही दिले. नागपूर ते चंद्रपूर महामार्ग नवेगाव मोरेपर्यंत करण्यात येत असल्याने पुढे सुरजागड लोह प्रकल्पापर्यंत या महामार्गाची लांबी वाढवण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, विकासाचे प्रकल्प पूर्ण करताना कालमर्यादेचे बंधन असावे. प्रकल्प रेंगाळला किंवा विलंब झाल्यास किंमत वाढीमुळे विनाकारण राज्यावर आर्थिक भुर्दंड बसत असतो. सध्या राज्यात १० लाख कोटींच्या पायाभूत सोयी - सुविधा प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या कामांच्या प्रगतीची गती कुठेही कमी पडू देऊ नये. ही कामे पूर्ण झाल्यानंतर अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे. त्यामुळे ही सर्व कामे नियोजनबद्ध विहित कालमर्यादेत पूर्ण करावी. राज्यामध्ये यापुढे पायाभूत सुविधांची कामे घेताना ती आधी गतिशक्ती पोर्टलवर आणावी. गतिशक्ती पोर्टलवर घेतल्याशिवाय प्रकल्पाचे काम सुरू करू नये. यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सिंचन प्रकल्पांची कामे घेतानाही भविष्यात येणाऱ्या अडचणी बघून सुरुवातीपासूनच नियोजन करावे. या प्रकल्पांचे भूसंपादन आधीच करून नंतर कामाला सुरुवात करावी. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने प्रकल्पांच्या सहज क्रियान्वयनाकरिता विस्तार करीत वेगवेगळे विभाग निर्माण करावे. पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती मिळण्यासाठी बाह्य स्त्रोतांद्वारे संबंधित क्षेत्रातील तज्ञ मनुष्यबळ घ्यावे. पायाभूत सोयी सुविधा प्रकल्पांना दिलेल्या आयडीमुळे देयकातील अनियमिततेवर निर्बंध येतील, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. सार्वजनिक बांधकाम आणि पाणीपुरवठा विभागाने जुनी देयके अदा करण्यासाठी दायित्वानुसार कालबद्ध कार्यक्रम राबवावा. विभागांनी झालेल्या कामांचीच देयके अदा होतील, यासाठी आणि देयकांच्या तपासणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने यंत्रणा विकसित करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, समृद्धी महामार्गावर १६ ठिकाणी स्वच्छतागृहांची व्यवस्था उभारण्यात येत आहे. तसेच पेट्रोल पंप, फूड मॉलची सुविधा असावी. स्वच्छतागृहांच्या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यात यावा. यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सल्लागार नियुक्त करावा. महामार्गावर १६ पैकी किमान चार ठिकाणी तरी एमएसआरडीसीने पर्यटनाच्या दृष्टीने केंद्र निर्माण करावीत. राज्यात पायाभूत सोयी सुविधांच्या प्रकल्पांकरिता निधी उभारण्यासाठी इच्छुक असलेल्या गुंतवणूकदारांच्या निधीतून भूसंपादनासह विकास प्रक्रिया राबवावी. पुढील विकासात त्यांचा सहभाग घेऊन निश्चित मोबदला त्यांना मिळण्याची व्यवस्था करावी. निधी उभारणीचे नवीन मॉडेल विकसित करावे. बैठकीस अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) मनीषा म्हैसकर, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी गुप्ता, प्रधान सचिव (नियोजन) सौरभ विजय, प्रधान सचिव (विधी व न्याय) सुवर्णा केवले, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

**पूर्व विदर्भातील पायाभूत रस्ते प्रकल्पांविषयी**

- नागपूर ते चंद्रपूर चार पदरी सिमेंट काँक्रिटीकरण महामार्ग, लांबी २०४ किलोमीटर, चंद्रपूर शहराला जोड रस्ता ११ किलोमीटर, भूसंपादनासह एकूण खर्च २३५३.३९ कोटी.
- नागपूर ते गोंदिया १६२ किलोमीटर लांबीचा चार पदरी द्रुतगती महामार्ग, भूसंपादन संयुक्त मोजणी आणि परवाने घेण्याची प्रक्रिया सुरू. अंदाजित किंमत १८,५३९ कोटी.
- भंडारा ते गडचिरोली चार पदरी द्रुतगती महामार्ग, लांबी ९४ किलोमीटर, अंदाजित रक्कम दहा हजार २९८ कोटी.भूसंपादन संयुक्त मोजणी आणि परवाने घेण्याची प्रक्रिया सुरू.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

06 TO 12 OCTOBER 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 10/4/2025 8:25 PM Page 1



# सय्यदपूर-कानेगाव मार्ग बस सुरू करण्याची मागणी

## वाहतुकीच्या अडचणींमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान; आंदोलनाचा इशारा

**देवणी : वार्ताहर**

सय्यदपूर, कवठाळा, तळेगाव (भो.) नागतीर्थवाडी, चवणहिप्परगा आदी गावांतील नागरिक आणि विद्यार्थ्यांना तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गेल्या दोन महिन्यांपासून कानेगाव मार्गावरील एस.टी. बससेवा बंद असल्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तसेच नागरिकांना दळणवळण, बाजारपेठ, दवाखाना आणि इतर शासकीय कामकाजासाठी प्रवास करणे कठीण झाले आहे. बससेवा बंद असल्यामुळे दररोज शाळा व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी बस हीच एकमेव वाहतुकीची सोय आहे. मात्र ती बंद असल्याने अनेकांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे त्यांच्या पालकांवर आर्थिक बोजा वाढला आहे. फक्त विद्यार्थीच नव्हे, तर सामान्य ग्रामस्थांनाही मोठा त्रास होत आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी,



दवाखान्यात उपचारासाठी, तसेच शासकीय कामकाजासाठी गावकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. परंतु बससेवा बंद असल्याने त्यांना खाजगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे वेळेचा आणि पैशाचा अपव्यय होऊन सर्वसामान्य माणूस अधिकच अडचणीत सापडला आहे, पूर्ववत बससेवा चालु करण्यासाठी देवणी येथील आगर प्रमुखाला निवेदन सादर करताना सुरज आंबुलगे, अमित सूर्यवंशी, महादेव कोटे, दत्ता बिरादार, राम लादे, दीपक मळभागे, कृष्णा इंगोले, मंगेश निवडगे, बसवा स्वामी, सचिन कल्याणकर, पुंडलिक पाटील, विकास बिरादार, अभिजीत पाटील, कृष्णा पाटील, बसवराज मळभागे, वैभव डोंबाळे, धीरज शिवगे, ज्ञानेश्वर नरवटे, बालाजी भुरे, रतन सूर्यवंशी यांच्यासह अनेक युवक उपस्थित होते. प्रशासनाने तातडीने बससेवा सुरू करून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा युवक व ग्रामस्थ रस्त्यावर उतरून आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# मामा पगारेंवर भ्याड हल्ला करणाऱ्यांवर ॲट्रोसिटी दाखल करा!

## जिल्हा काँग्रेसची पोलीस प्रशासनाकडे लेखी तक्रार

**वसई : वार्ताहर**

काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते तथा जेष्ठ नागरिक प्रकाश उर्फ मामा पगारे यांच्यावर भ्याड हल्ला करणाऱ्या संबंधीत गुंड प्रवृत्तीच्या लोकांवर अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कलमांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्यावर उचित पोलीस कारवाई करावी अशी लेखी तक्रार वसई विरार शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाध्यक्ष ओनील आल्मेडा यांनी पोलीस आयुक्त आणि वसई पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना दिली आहे. जर पोलीस प्रशासनाने या गुंड प्रवृत्तीच्या लोकांविरूध्द विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून योग्य ती कायदेशीर कारवाई केली नाही तर काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून लढा उभारण्यात येईल याची गंभीर नोंद घ्यावी असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरूध्द पोस्ट व्हायरल केली म्हणून, काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते तथा जेष्ठ नागरिक प्रकाश उर्फ मामा पगारे यांच्यावर कल्याण मध्ये भारतीय जनता पक्षाशी संबंधीत असलेल्या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी हल्ला केला व त्यांना भर रस्त्यात साडी नेसवून त्यांचा मोठा अपमान केला आहे. या मानवतेला लाजणाऱ्या दुर्दैवी घटनेचा वसई विरार शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने तिव्र शब्दात निषेध केला आहे. ह्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींवर त्वरीत विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांच्यावर उचित पोलीस कारवाई करावी यासाठी काँग्रेसने आक्रमक भूमिका घेतली आहे. प्रकाश उर्फ मामा पगारे हे काँग्रेस पक्षाचे निष्ठावान कार्यकर्ते असून ते मागासवर्गीय समाजाचे आहेत. त्यांना एकटे गाठून या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी भर रस्त्यात त्यांच्यावर हल्ला केला आहे.

ही अत्यंत गंभीर स्वरूपाची घटना असून पोलीस प्रशासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. ही बाब अत्यंत दुर्दैवी व लाजीरवाणी आहे. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यावर झालेल्या या हल्ल्याचा आम्ही सर्वजण जाहीर निषेध करीत आहोत. या गुंड प्रवृत्तीच्या विरूध्द पक्ष सतत लढा देत असतो व यापुढेही देत राहील असेही शेवटी ओनील आल्मेडा यांनी म्हटले आहे.

# नालासोपाऱ्यात कपड्याचे दुकान आगीत जळून खाक



**नालासोपारा : वार्ताहर**

नालासोपारा पूर्वेच्या चंदननाका परिसरातील एका कपड्याच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना मंगळवारी दुपारी दीडच्या सुमारास घडली. आगीवर नियंत्रण मिळवण्यात पालिकेच्या अग्निशमन विभागाला यश आले आहे. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही. नालासोपारा पूर्वेला असणाऱ्या चंदननाका परिसरात असणाऱ्या आयेशा अपार्ट्मेंटमधील एका कपड्याच्या दुकानाला अचानक आग लागली. कपड्यामुळे काही क्षणातच आगीचा भडका होऊन आग पसरण्यास सुरुवात झाली. यावेळी आगीची माहिती वसई विरार पालिकेच्या अग्निशमन विभागाला देण्यात आली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. एका दुकानाला लागलेली आग पसरल्याने शेजारच्या दोन दुकानांनाही आग लागली. दोन तासांच्या अथक प्रयत्नानंतर आगीवर नियंत्रण मिळवण्यात अग्निशमन विभागाच्या जवानांना यश आले आहे.

यावेळी कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागल्याचे कारण अजूनही स्पष्ट झालेले नाही. मात्र यात दुकानातील सर्व माल जळून खाक झाल्याने दुकान मालकाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. यापूर्वी सुद्धा शहरात आग लागल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

# महिला महाविद्यालयातील नेहा सपकाळे बेंडाळे महाविद्यालयाची गरबा क्वीन

**जळगाव : वार्ताहर**

डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय (स्वायत्त) येथे दोन दिवस गरबा स्पर्धा आयोजित करण्यात आली. यात एफ.वाय.बी. कॉम.वर्गाची कु.नेहा सुनील सपकाळे हीस गरबा क्वीन, टी.वाय.बी.एस्सी. वर्गाची कु.तन्वी नंदकिशोर महाजन हिला बेस्ट परफॉर्मन्स आणि टी. वाय.बी. कॉम. वर्गाची कु.दिक्षा नारायणराव शिंदे हिने बेस्ट कॉस्च्युम पारितोषिक पटकाविले.तसेच टी. वाय.बी.ए.वर्गाची कु.दीपाली विनोद सोनी व एस वाय.बी. कॉम.वर्गाची कु.तृप्ती भरत सोनार या विद्यार्थिनींना उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली. नवरात्र उत्सवानिमित्त महाविद्यालयात कला व संस्कृती जोपासण्याच्या दृष्टिकोनातून गरबा प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या प्रशिक्षणात सहभागी असणाऱ्या विद्यार्थिनींसाठी कला मंडळाकडून नवरात्र उत्सवानिमित्त 'गरबा स्पर्धा' आयोजित करण्यात आली. शहरातील एस.एन.डी.टी. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्री नेमाडे कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.व्ही.जे पाटील होते. कार्यक्रमाची सुरुवात करताना सायंकाळी सहा वाजता स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. स्पर्धेत विविध फेऱ्या घेण्यात आल्या. त्यामधून सहभागी असणाऱ्या विद्यार्थीनींनी आपले कला कौशल्य गरबाच्या



माध्यमातून सादर केले. या स्पर्धेत परीक्षक म्हणून श्रीमती छाया पाटील व डॉली आनंदकुमार यांनी काम पाहिले. परीक्षण संपल्यानंतर पारितोषिक वितरण समारंभ घेण्यात आला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. व्ही. जे पाटील यांनी अध्यक्षीय विचार मांडले. ते म्हणाले, अभ्यासपूरक कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनींनी सहभाग नोंदवून आपले व्यक्तिमत्व विकसित करून, अधिक निर्भय आणि धाडसी बनावे,त्याचबरोबर उत्तुंग भरारी घेण्यासाठी आपल्या मनामध्ये जिद्द, परिश्रम आणि चिकाटी इत्यादी गुणांची आवश्यकता असते. आपल्या इच्छाशक्तीच्या बळावर आपण आपले अवकाश उभारू शकतो त्यासाठी अभ्यासासोबत कला जोपासणे आवश्यक आहे असा प्रेरणादायी मंत्र मुलींना दिला. या संपूर्ण प्रशिक्षणाचे व स्पर्धेचे आयोजन कला मंडळाचे प्रमुख प्रा. डॉ.अनिता कोल्हे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.पी.एन. तायडे, उपप्राचार्य डॉ.सत्यजित साळवे, सौ. सुनीता पाटील व आय.क्यू.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. स्मिता चौधरी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अनिता कोल्हे यांनी केले. प्रा. रंजना पाटील, प्रा.शितल चौधरी, प्रा.अमृता नेतकर, प्रा.राणी त्रिपाठी, प्रा. मिताली अहिरे प्रा. शांताराम तायडे, प्रा.मंगेश किनगे, प्रा.कल्पना खेडकर वसतिगृहाच्या अधिक्षिका कामिनी धांडे तसेच कला मंडळातील सर्व सदस्य व शिक्षकेतर सहकारी यांनी परिश्रम घेतले. गरबा स्पर्धेला महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी व शिक्षक व शिक्षकेतर सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसईत वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळे उभी भात पिके झोपली



**वसई : वार्ताहर**

मागील दोन दिवसांपासून वसई विरार भागात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस कोसळत आहे. या पावसाचा मोठा भात शेतीला बसला असून कापणीसाठी तयार होत होत असलेली भाताची कणसे आडवी झाले आहे. यामुळे भात पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. वसईच्या पूर्व व पश्चिम पट्ट्यातील भागात ७ हजार हेक्टरहून अधिक जागेत खरिपाची लागवड करण्यात आली आहे. यात गर्व, निमगर्व व हलव्या अशा भात पिकांचा समावेश आहे. काही ठिकाणी निमगरव्या भाताची निसवण सुरू झाली होती. तर काही ठिकाणी हळवे भातपूर्ण निसवले असून कणसात दाणेही भरले आहेत. तर दुसरी गरव्या भाताची कणसेही हळूहळू तयार होऊ लागली आहे. परंतु वसई विरार भागात सप्टेंबर महिना संपत आला तरीही पावसाचा जोर कायम आहे. मागील दोन दिवसांपासून अधूनमधून विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस कोसळत आहे. वारा पाऊस जोराने सुरू असल्याने याचा मोठा फटका भात शेतीला बसला. या झालेल्या पावसामुळे पूर्णतः पिकेच आडवी झाली आहेत. भाताची कणसे तयार होण्याच्या काळात पावसाची उसंत मिळायला हवी होती. मात्र जोराचा झाल्याने पिकांची अक्षरशः दैना केली असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. हळवी शेती गेल्यात जमा आहे. तर निम गरवीशेती जी कणसे टाकत आहे ती व गरवी शेती जी पोटरी धरलेली भात शेती आहे तिच्या गाभात पाणी गेल्याने पुढे येणारी कणसे ही दाणे नसलेली म्हणजेच पलिंद पीक येणारी असल्याची दाट शक्यता आहे. असे शेतकऱ्यांनी सांगितले आहे. कृषी विभागाने शेतीची पाहणी करून योग्य ते उपाय सुचवण्याची मागणी तसेच शेतकऱ्यांना या संकटातून शासनाने सर्वतोपरी दिलासा देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# तळेगाव येथील नवरात्र महोत्सवानिमित्त मान्यवरांचा सत्कार

**देवणी : वार्ताहर**

देवणी तालुक्यातील तळेगाव भोगेश्वर येथे नवरात्र महोत्सवा निमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विठ्ठल महाराज शिवणखेडकर हे उपस्थित होते, तर प्रमुख उपस्थितीत जागृती शुगर अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेडचे व्यवस्थापक गणेश येवले, कृषी



अधिकारी कदम, भगवान गायकवाड, शंकराव भाऊराव पाटील, तातेराव निडवंचे, शंकरराव बिरादार,धनाजी जाधव, ज्ञनोबा विळेगावे, नरसिंग काळे आदी उपस्थित होते. तळेगाव गावातील सुपत्रानी विविध क्षेत्रात नाव लौकिक करून आपल्या कार्याचा ठसा उमविठणाऱ्या लोकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन तथा संयोजक मालबा घोणसे यांच्या वतीने करण्यात आले. शिक्षण क्षेत्रात व्यंकटराव कोनाळे, आध्यात्मिक क्षेत्रात ह.भ.प. अलकाताई बिरादार, विधी क्षेत्रात ॲड. आदीती उमेश निटूरे, कृषी क्षेत्रात रामदास बिरादार, रतन बाबुराव कोनाळे, धनाजी शेषेराव जाधव, रामदास राजकुमार कोनाळे, वैद्यकीय क्षेत्रात कु.पुजा हाणमंत पाटील, अभिषेक किशोर निडवंचे, दत्ता प्रकाश पाटील, ज्ञानेश्वर अर्जुन पाटील, भास्कर संभाजीराव पाटील, अविनाश राजकुमार कोटे, क्रिडा क्षेत्रात आनंद बाबुराव घोणसे, उद्योजक क्षेत्रात तुकाराम बाबुराव विळेगावे, दादाराव लक्ष्मण धनेगांवे, वैद्यकीय क्षेत्रात डॉ. नितीन जयतीर्थ जोशी, डॉ. श्रीधर आण्णाराव जाधव, देश सेवा ज्ञानेश्वर पांडुरंग कांबळे श्रीनिवास नारायण इंगोले, वसीम मैत्रोद्दीन शेख पटेल, बस्वराज शिवाजीराव कोटे, पत्रकारीता क्षेत्रात, दत्ता किशनराव पाटील, उद्योजक क्षेत्रात राहुल व्यंकटराव बिरादार, संजीव सोपान इंगोले, पांडूरंग बाबाराव शेळगे बालाजी सोपान कुंदाडे, भिमराव भगवंतराव निडवंचे, माधव नागोराव लादे, तानाजी शेषराव कोनाळे आदीचा यावेळी शाल श्रीफळ, फेटा, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

# डहाणूत शेतकऱ्याचा पूराच्या पाण्यात वाहून दुर्दैवी मृत्यू

**डहाणू : वार्ताहर**



पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील कळमदेवी परिसरातील रायपूर येथील एका शेतकऱ्याचा रविवार २८ सप्टेंबर रोजी पुराच्या पाण्यात पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. रायपूर येथील रहिवासी सदानंद भुरभुरा (वय ५५) हे रविवार २८ सप्टेंबर रोजी सकाळी शेतीची पाहणी करून घरी परतत होते. त्यावेळी मुसळधार पावसामुळे नदीला प्रचंड पूर आला होता. नदी ओलांडण्याच्या प्रयत्नात त्यांचा पाय घसरला व ते पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. सकाळपासून ते घरी परतले नसल्यामुळे कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला असता दुसऱ्या दिवशी सोमवार २९ सप्टेंबर रोजी सकाळी कळमदेवी येथील शिलोंडा ग्रामपंचायत हद्दीत नदीकाठी त्यांचा मृतदेह आढळून आला. मृतदेह तातडीने कासा उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी हलविण्यात आला आहे. या घटनेचा पंचनामा करण्यात आला असून शासनाच्या नियमानुसार संबंधित कुटुंबाला नुकसानभरपाई मिळावी यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात येत असल्याची माहिती स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आली आहे. याप्रकरणी कासा पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त आ.अमित देशमुख यांनी केले विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन!

**लातूर : वार्ताहर**

राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी गुरुवार दि. २ ऑक्टोबर रोजी लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे जाऊन धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. सर्वांना धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. यावेळी खासदार डॉ. शिवाजी काळगे, लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सचिव समद पटेल, ट्वेंटीवन शुगरचे व्हा. चेअरमन विजय देशमुख, माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे, माजी उपनगराध्यक्ष मोहन माने, रेणा सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन प्रवीण पाटील, माजी उपमहापौर कैलास



कांबळे, लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष घोडके, प्रा. प्रवीण कांबळे, इम्रान सय्यद, व्यंकटेश पुरी, बाबासाहेब गायकवाड, चंद्रकांत चिकटे, अतिश चिकटे, दगडूआप्पा मिटकरी, संजय ओहळ, सुमित खंडागळे, राजू गवळी, अकबर माडजे, गोरोबा लोखंडे, करुणा शिंदे, सुलेखा कारेपूरकर, शरद देशमुख, पंडित कावळे, सुरेश चव्हाण, राम स्वामी, गोटू यादव, आसिफ बागवान, देविदास बोरुळे पाटील, यशपाल कांबळे, राज क्षिरसागर, अंगद गायकवाड, फारूक शेख, बिभीषण सांगवीकर, मोहन सुरवसे, राजू गवळी, प्रवीण सूर्यवंशी, रमेश सूर्यवंशी, गोपाळ बुरबुरे, विष्णुदास धायगुडे, अंगद गायकवाड, राम स्वामी, विजय टाकेकर, अब्दुल्ला शेख, करीम तांबोळी, अभिमान भोळे आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

# मिरा-भाईंदर महापालिका घेणार पाण्यात बुडणाऱ्यांना वाचवण्यासाठी रोबोची मदत

**मिरा-भाईंदर : वार्ताहर**

समुद्र, खाडी, नैसर्गिक तलावात बुडणाऱ्या व्यक्तीला वाचवण्यासाठी आता रोबोटची मदत होणार आहे. महापालिका प्रशासनाकडून दोन रोबोटिक वॉटर टॅक्सी यंत्र खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पाण्यात बुडणार्या व्यक्तीला कमी वेळात पोहोचण्यासाठी हे यंत्र उपयोगी ठरणार आहे. याबाबत महापालिका प्रशासनाकडून निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर परिसराला समुद्र किनारपट्टी लाभली आहे. वर्सोवा, उत्तन परिसरात तर भाईंदर पूर्व पश्चिमेला खाडीचा पट्टा लाभला आहे. त्या परिसरात पर्यटकांची मोठी गर्दी पाहायला मिळते. पाण्याचा अंदाज न आल्याने हौशी पर्यटक अडकल्याच्या व मृत्यूच्या घटना देखील घडले आहेत. त्यामुळे हे यंत्र एक मदतीचे केंद्रबिंदू ठरणार आहे. अडकलेल्या पर्यटकांच्या मदतीला महापालिकेच्या अग्निशमन दलासह स्थानिक मच्छीमार धावून जातात. बोटीच्या सहाय्याने बुडणाऱ्या व्यक्तीपर्यंत अग्निशमन पथकाला पोहोचावे लागते. यावेळी मच्छीमारांची बोट किनार्यावर उपलब्ध नसल्यास बुडणाऱ्यापर्यंत तात्काळ पोहोचता येत नाही. परिणामी बुडणार्याचा जीव ही धोक्यात येतो. म्हणून कमी कालावधीत पाण्यात बुडणार्या व्यक्तींपर्यंत मदत पोचून त्यांची सुटका करण्यासाठी मुंबईच्या धर्तीवर रोबोटिक वॉटर रेस्क्यू यंत्र खरेदी करण्याचा निर्णय पालिका प्रशासनाकडून घेण्यात आला आहे. सुमारे २८ लाख रुपये खर्चून ही दोन यंत्र खरेदी केल्या जाणार आहेत. त्याकरता नुकतीच निविदा देखील प्रसिद्ध करण्यात आली आहे.

06 TO 12 OCTOBER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/4/2025 8:25 PM Page 1



# दुचाकी चोरी करणारे तीन आरोपी पोलिसांच्या जाळ्यात




**उल्हासनगर : वार्ताहर**

उल्हासनगर शहरांमध्ये दुचाकी चोरणाऱ्या चोरांनी धुमाकूळ घातला होता, अशा तीन चोरांना उल्हासनगर मध्यवर्ती पोलिसांनी अटक केलीय. काही दिवसा अगोदर स्वस्तिक होंडा या शोरूम बाहेरून तीन मोटारसायकल चोरीस गेल्या होत्या. मालकाकडून मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर मध्ये तक्रार करण्यात आली होती. वरिष्टांच्या मार्गदर्शन खाली या गुन्ह्याचा छळा लावण्यास पोलिसांना यश आले. या चोरांकडून चोरी केलेल्या तीन दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. काही दिवसांपूर्वी कॅम्प तीन च्या शांतीनगर परिसरात असलेल्या स्वास्तिक होंडा या शोरूम बाहेरून दुचाकी चोरीला गेल्या होत्या. त्याचा तपास करत असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्हीच्या आधारे साहिल गोरे, सनी साळवे सुमित खोपटे या तिघांना अटक केली. त्यांच्याकडून चोरलेल्या ३ लाख ६० हजार रुपयांच्या तीन दुचाकी हस्तगत करण्यात आल्यात. दरम्यान या चोरांनी आणखीन किती अशा चोरीचे गुन्हे केले आहेत. यामागे एखादी टोळी सक्रिय आहे का याचा देखील पुढील तपास मध्यवर्ती पोलीस करत आहेत.

# पाकिस्तानातील ड्रग्सचा भारतात प्रवेश; विरार गुन्हे शाखा कक्ष ३ ची करवाई

**वसई : वार्ताहर**

देशभर पसरलेल्या अमली पदार्थांचे जाळे आता थेट पाकिस्तानपर्यंत पोहोचले आहे. राजस्थान सीमेलगत असलेल्या पाकिस्तानच्या एका छोट्या गावातून भारतात तस्करी करून अमली पदार्थ आणले जात असल्याचे गुन्हे शाखा ३ च्या पथकाने उघडकीस आणले आहे. गुन्हे शाखेने नुकतीच कारवाई करून ८ कोटींचे अमली पदार्थ जप्त केले होते. त्या तपासात ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. वसई विरार व मीरा भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी होऊ लागली आहे. अशा अमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली कारवायांच्या मोहिमा सुरू केल्या आहेत. ११ सप्टेंबर रोजी विरार गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने फादरवाडी रेंजनाका रस्त्यावरील श्रीपाल टॉवर येथे सापळा रचून कारवाई करत समुंदरसिंग देवडा (४९), युवराजसिंग राठोड (२८), तकतसिंग राजपूत (३८) या तीन आरोपींना अटक केली होती. आरोपींकडून ८ कोटी ४ लाख ४०



हजार किंमतीचा २ किलो ११ ग्रॅम वजनाचा हेरॉईन नावाचा अमली पदार्थ जप्त करून त्यांच्यावर वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता. तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारे यातील अमली तस्करीतील मुख्य सूत्रधाराला राजस्थान मधील सिरोही येथून अटक केली आहे. हरिसिंह तेजसिंह रावलोटी भाटी (५५) असे या अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपींच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. अटक करण्यात आलेला हरिसिंह हा आरोपी हा भारत पाकिस्तान सीमेलगत असलेल्या सतू या गावात राहतो. या अमली पदार्थांचा पुरवठा पाकिस्तानातून होत असल्याची कबुली त्याने पोलिसांना तपासा दरम्यान दिली आहे. हा आरोपी पाकिस्तान मधील अमली पदार्थ पुरवठादारांच्या संपर्कात असून जेसेलमेर सीमेजवळून हा तस्करी करीत होता असे विरार गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे यांनी सांगितले आहे. जप्त केलेल्या हेरॉईन अमली पदार्थांची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात ८ कोटीहून अधिक असल्याचे त्यांनी सांगितले आहे. ही कारवाई विरारच्या गुन्हे शाखा कक्ष ३ चे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, आदींच्या पथकाने केली. मीरा भाईंदर व वसई विरारमध्ये तेलंगणा राज्यातून अमली पदार्थांची तस्करी होत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले होते याच पार्श्वभूमीवर तेलंगणा राज्यात गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी करून कारखाने उध्वस्त केले होते. यात सुमारे ६ हजार किलो ग्रॅम वजनाचे मॅफेड्रोन अमली पदार्थ जप्त केले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर या अमली पदार्थांची किंमत १२ हजार कोटी इतकी होती. पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्वात मोठी कारवाई होती.

पान १ वरून....

## पत्नीला समजवण्याचा प्रयत्न फोल...

कुणकुण प्रशांतला लागलेली होती. आपल्या माघारी ती त्याला भेटत असते आपण घरी नसताना तिचा प्रियकर घरी येवून तिच्याशी मजा मारत असतो हे त्याला कोणाकडून तरी समजले होते. त्यामुळे तो रोज दारू पिऊन आला की, तिला मारझोड करून तुझा यजमान कोण आहे? मला तरी कळू दे. तु त्याच्याबरोबर मजा मारणार आणि मला उपाशी ठेवणार असे म्हणत तो तिला नको नको ते बोलत होता. काजल ही देखणी आणि सुदंर असल्याने देखणी बायको दुसऱ्याची असते हे त्याच्या मनात बसले होते. त्यामुळे तो रोज उठ सुठ तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला घाण घाण शिव्या देत होता. त्यामुळे त्याच्या मारहाणीला कंटाळून ती माहेरी मलकापुर येथे जात होती. ती माहेरी गेली की आठ पंधरा दिवस सांगलीला परत येत नव्हती. त्यामुळे त्याच्या मनात भलते सलते येत होते.ती माहेरी जावून प्रियकराबरोबर मजा मारत असेल म्हणून ती भांडण करून एकदा गेली की, आठ पंधरा दिवस परत येत नाही हे त्याच्या डोक्यात होते. काजल आणि त्याची भांडणे तिच्या माहेरच्या लोकांनी बऱ्याच वेळेला मिटवली होती. भांडणात त्यांनी काजल हिला समजावून सांगण्यापेक्षा प्रशांतलाच तु दारू पितोस म्हणून तुझ्या डोक्यात नाही ते विचार येतात म्हणून त्याचीच खरडपट्टी काढली होती.त्यामुळे तो पत्नी काजल आणि तिच्या माहेरच्या लोकावर ही चिडत होता. सांगलीत तर त्याची भांडणे नित्याचीच झालेली होती. शेजाऱ्यांनी ही त्याची भांडणे मिटवण्याचा प्रयत्न केला परंतु काही केल्या नवरा बायकोची भांडणे काही मिटत नव्हती. उलट दिवसे दिवस ती भांडणे वाढतच चालली होती. हल्ली काजल ही दिवस दिवस कोणाबरोबर तरी मोबाईलवरून बोलत असायची. ती ज्याच्याशी मोबाईलवरून बोलत असायची तो तरूण प्रशांतच्या माघारी त्यांच्या घरी येत जात होता. परंतु तो तरूण नेमका कोण आहे हे प्रशांतला माहित नव्हते. त्यामुळे तो हवेतच गोळ्या मारल्यागत करीत होता. काजल आणि त्या तरूणाच्या संबंधाची चर्चा ही शेजाऱ्यात ही होऊ लागली होती. त्यामुळे ही चर्चा त्याच्या कानावर आली की त्याच्या तळ पायाची आग मस्तकात जात होती. काजलचे दोन्ही मुलींच्याकडे लक्ष नव्हते हे ही त्याच्या लक्षात येत होती. त्याची एक मुलगी सहा वर्षाची तर दुसरी चार वर्षाची असल्याने त्या तशा लहानच असल्याने त्यांना काय आई बाबांचे भांडण समजणार घरात आई वडिलांचे भांडणे सुरू झाली की, त्या दोन्ही लहान मुली मोठ्याने रडत असायच्या. काजल ही भांडणात त्याच्या जवळच मुलींना सोडून जात असल्याने त्याची देखभाल करताना ही त्याच्या नाकी नऊ येत होते. त्यामुळे त्याची जास्तच चिडचड होत होती. तिला संसाराचे काहीच नाही. उलट ती प्रियकराबरोबर मजा मारायला मोकळी असते हे त्याने ओळखले होते. भांडणात तो तिला रोज तु तुझ्या याराकडे जा माझ्या संसारातून निघून जा असे म्हणत होता. हल्ली भांडणात ती ही त्याला उलट बोलत होती. त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत तु मला जे काही देवू शकत नाहीस ते मला माझा प्रियकर देतो असे म्हणत ती आपले विवाहबाहय संबंध मान्य करीत होती. त्यातच त्याचे डोके सटकत होते. अशातच गेल्या महिन्यात काजल ही नवरा प्रशांत याला न सांगता घरातून बाहेर भांडण करून गेली होती. त्याने तिचा शोध तिच्या माहेरी ही घेतला परंतु ती तेथे नव्हती. मग ती गेली कुठे असा प्रश्न त्याला पडला होता. त्याला समजले की आपली पत्नी ही तिच्या प्रियकरासोबत दुसरीकडेच राहत आहे. त्यामुळे प्रशांत हा दारू पिऊन आपल्या सासरवाडीत जावून त्याच्याबरोबर भांडण करू लागला होता. त्यावेळी तिच्या माहेरच्या लोकांनी तिचा शोध घेऊन तिची ही समजूत काढून तिला प्रशांत बरोबर सांगलीला परत पाठवले होते. ती नुकतीच दोन तीन दिवस झाले असतील सांगलीला येवून तोच त्याचे पुन्हा मागचे तसे पुढे चालू झाले होते. या दोन तीन दिवसात त्याने काजलला तु कोणाबरोबर कुठे गेली होतीस याचा जाब विचारून हैराण करून टाकले होते. त्याने तिला किती ही मारहाण केली तरी तिने त्याचा मार खावून आपण कोणाबरोबर कुठे गेलो होतो हे काहीच सांगितले नाही आपली बायको आठ पंधरा दिवस बाहेर राहून दुसऱ्यासोबत शेण खावून आली आहे हे त्याने ओळखले. त्याच्या मनात तिच्या विषयी भयंकर राग आलेला होता. आता हिचा गोड बोलूनच काटा काढयाचा याचा त्याने विचार केला. घटनेच्या आदल्या रात्री नवरा बायकोनी बेडवर आपली रात्र रंगीन करीत आता आपण चांगले राहयचे. भांडण करायचे नाही असे ठरविले. प्रशांत ही त्या रात्री तिच्याशी गोड बोलत होता.त्याने तिच्याबरोबर मनसोक्त शरीरसुख घेतले. परंतु हे शरीर सुख घेत असताना ही बाहेर शेण खावून आली आहे हे त्याच्या डोक्यातील काही जात नव्हते. तिच्याबरोबर मजा मारून झाल्यावर तो शांत झोपण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु तिच्या बाबत असणारी डोक्यातील किड काही जात नव्हती. बेडवर तो रात्र भर या कुशी वरून त्या कुशीवर करीत होता. दुसऱ्या दिवशी तो सकाळी लवकर उठला आंघोळ वैगरे करून मी कामाला जातो असे सांगून घराच्या बाहेर पडला. परंतु तो काही त्यावेळी कामावर गेला नाही. आज रविवार आहे कशाला कामाला जायचे हा विचार मनात करून तो सकाळी १० वाजणेच्या दरम्यान कामावर न जाता घराकडे दारू पिऊनच आला. सकाळी सकाळी तो दारू पिऊन घरात आल्यावर काजल हिचे डोके सणकले. ती त्याच्यावर ओरडू लागली. दोघांची भांडणे सुरू झाली. ती घरातील कामे करीत होती. भांडता भांडता तिने घरातील कामे आटोपली. तशी ती रागाच्या फणकरातच बेडवर जावून झोपली. तिला तशी झोप काही लागली नव्हती. तिला बेडवर गाऊनवर झोपलेली बघून प्रशांतचे डोके हादरले. इथे कशाला माझ्या बेडवर झोपतेस तुझ्या याराबरोबर जावून झोप जा असे त्याने तिला रागात म्हटले. त्यावर ती चिडली.ती ही त्याला शिव्या घालू लागली. दोघांची भांडणे वाढतच चालली भांडता भांडता तिने झोपेचे सोंग घेतले. तिच्यावर तो चिडला होताच.त्याने स्वयंपाक घरात जावून चाकू आणला आणि उताणी झोपलेल्या काजलच्या गळ्यावर सरर्कन फिरविला.तसे तिचा गळा चिरला गेल्याने त्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला. तिचा गळा चिरल्यावर तो काही शांत झाला नाही त्याने त्याच चाकूने परत तिच्या मानेवर हातावर आणि पोटावर सपासप वार केले. ती ओरडत होती पण त्याने दार लावून घेतल्याने तिच्या ओरडण्याचा आवाज बाहेर गेला नाही. तिच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने तिचा जागीच मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याची दारू उतरली. तो आपल्या दोन्ही लहान मुलीना घेतले आणि शेजारी काही अंतरावर राहत असलेल्या आपल्या आईच्या घरात सोडले. तो कोणालाच काही बोलला नाही. तो परत आपल्या घराकडे आला. त्याने घराला बाहेरून कडी लावली आणि तडक सांगली शहर पोलीस स्टेशन गाठले. पोलीस स्टेशनमध्ये जावून त्याने स्वत:ला आत्मसमर्पण करीत मी माझ्या बायकोचा चारित्र्याच्या संशयातून खून केल्याचे त्याने हजर असलेल्या पोलीसांना सांगितले.त्याच्याकडून खूनाची ही माहिती ऐकून पोलीस ही हादरून गेले. त्यांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला घेऊन पोलीसांनी शांतीनगर येथील घटनास्थळ गाठले.पोलीसांनी घराचा दरवाजा उघडून आत पाहिले तर बेडवर त्याची पत्नी काजल ही रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. बाजुलाच रक्ताने माखलेला चाकू ही पडला होता.

घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देवून घटनेची पाहणी केली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह सांगली सिव्हिल हॉस्पिटल येथे शवविच्छेदनसाठी पाठवून दिला. उतरीय तपासणीनंतर संध्याकाळी उशिरा काजल हिचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात अंतिम संस्कारासाठी दिला. या घटनेची लेखी फिर्याद मयत काजल हिच्या भावाकडून घेण्यात आली. त्याने दिलेल्या फिर्यादीप्रमाणे काजल प्रशांत एडके (वय २४) रा.सांगली. हिच्या खून प्रकरणी तिचा पती प्रशांत एडके (वय ३०) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला सोमवारी कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या दरमन्यान पोलीसांनी प्रशांत ऐडके याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास सांगली शहर पोलीस स्टेशनचे पो.निरी.संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

पान ८ वरून....

## १४ वर्षांचा वनवास भोगायला लावणाऱ्या...

झाले असल्याचा आरोप प्रमोद पवार यांनी केला आहे. विशेष म्हणजे या रस्त्यावरील ठेकदार जिजाऊ कन्स्ट्रक्शन, मयुर कन्स्ट्रक्शन, हर्षल गंधे, निलेश अंबावणे या ठेकेदारांनी शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून दुरुस्तीचा पैसे लाटत दुरुस्ती कामामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप प्रमोद पवार यांनी केला आहे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन या ठेकेदार कंपनीवर विधान परिषदेत काळ्या यादीत टाकण्याची घोषणा केली पण त्या नंतर ही या कंपनीला ४६ कोटी रुपयांचे दुरुस्तीचे काम पुन्हा देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांना बक्षिसी दिली आहे. रस्ते दुरुस्तीचे दायित्व २०२९ पर्यत असताना ती दुरुस्ती न करता ठेकेदारांना नव्या कोट्यावधी रुपयांच्या खिरापत ठेकेदारांना दिली. शासनाने या संपूर्ण रस्त्याच्या कॉंक्रिट करणाचे ८०३ कोटी रुपयांचे काम ईगल कन्स्ट्रक्शन या ठेकदारास दिले.पण त्याचे ही काम संथ गतीने सुरू आहे.

या रस्त्याचे दुरुस्ती कामात भ्रष्टाचार करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी.विधान परिषदेतील काळ्या यादीत ठेकेदारास टाकण्याच्या घोषणेची अंमलबजावणी करावी.या रस्त्याची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी व सध्या काम दिलेल्या ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीने तत्काळ काम करावे अशा मागण्यां प्रमोद पवार यांनी केल्या असून मागण्यांची पूर्तता होत नाही तोपर्यत हा लढा सुरू राहील असा निर्धार शेवटी प्रमोद पवार यांनी व्यक्त केला आहे.या औरंगी चोख असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## दैनंदिन जीवनात राष्ट्राला प्राधान्य ...

होईल ते ते करणे आवश्यक असल्याचे सांगितले. देश आणि देशाच्या सीमेचे संरक्षण करणे म्हणजेच राष्ट्र प्रथम हे कर्तव्य बजावणे आहे असे नाही तर देशातील शोषित, वंचित आणि गरजवंताना निस्वार्थ भावनेतून मदतीचा हात पुढे करणे हे सुद्धा राष्ट्र प्रथम या संकल्पनेअंतर्गत येत असल्याचे अधोरेखित केले. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या प्रत्येक विचारातून आणि कृतीतून ज्या पद्धतीने देशहिताला प्राधान्य दिले आहे त्याच पद्धतीने प्रत्येक नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात देशहिताचा विचार करून राष्ट्राला प्राधान्य देणारे कार्य केल्यास निश्र्चितच आपला भारत आत्मनिर्भर होऊन जगातील महासत्ता बनेल असा विश्र्वास डॉ.लहाने यांनी यावेळी व्यक्त केला. मात्र यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात राष्ट्राला प्राधान्य देणारे कार्य करावे असे आवाहन डॉ.तात्याराव लहाने यांनी यावेळी केले. राष्ट्र प्रथम या भावनेतून कार्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरात देशाचा सन्मान वाढवण्याचे काम केले असल्याचे सांगून माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले कि देशातील प्रत्येक समाजातील नागरिकांच्या हिताचा विचार करून आपल्या राष्ट्राला अधिक बळकट करण्यासाठी कार्य करण्याचा जो संदेश पंतप्रधान मोदी सातत्याने घेत आहेत या संदेशानुसार केवळ भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकांनी कार्य करावे असे आवाहन माजी मंत्री आ.निलंगेकर यांनी यावेळी केले. या मेळाव्याला संबोधित करताना आ.अभिमन्यू पवार यांनी शहर जिल्हा भाजपच्या वतीने सेवा पंधरवाडा अंतर्गत जे कार्यक्रम झाले आहेत ते निश्र्चितच पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या विचारांना अपेक्षित असल्याचे सांगून या माध्यमातून आपण सर्वांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शतायुष्यासाठी प्रार्थना करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. राष्ट्र प्रथम या संकल्पनेनुसार कार्य करत विकसित भारताचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो संकल्प केला आहे तो संकल्प पुर्ण करत असताना प्रत्येक नागरिकांनी आपल्या हृदयात राष्ट्र प्रथम ही भावना रुजवणे आवश्यक असल्याचे भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे. विकसित भारत घडत असताना प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी कर्तव्य भावनेतून निभावली तर विकसित भारताची सुरु झालेली आपली घोडदौड निश्र्चितच पुर्णत्वास जाईल असा विश्र्वास भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी व्यक्त केला. या मेळाव्यात डॉ.विठ्ठल लहाने, ॲड.शैलेश गोजमगुंडे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळाव्याचे सहसंयोजक मनोज सुर्यवंशी तर सुत्रसंचलन अब्दुल गालिब शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतमातेचे पुजन करण्यात आले तर सांगता राष्ट्रगीताने झाली. सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी सेवा पंधरवाड्याचे शहर जिल्हा संयोजक अमोल गीते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे, मेळाव्याचे संयोजक प्रा.उदय देशपांडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ.हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या ...

कृती प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. संस्थेचे संस्थापक निवृत्ती यादव यांनी यावेळी आपल्या संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. संस्थेच्या वतीने आतापर्यंत वेळोवेळी नैसर्गिक आणि राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी संस्थेच्या वतीने सर्वतोपरी आर्थिक सहायता करण्यासाठी पुढाकार घेतला जात सल्याचे सांगितले. दरम्यान राज्यातील आपदग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सहाय्यता करण्याचे आवाहन केले जाते आणि त्याला नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळतो, ही बाब खरी असली तरी अहमदपूरच्या डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थांनी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून निधी संकलित केल्याचे पाहून आपणास अतिशय समाधान वाटल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शासनाने आवाहन केले आहे म्हणून नव्हे तर पुरग्रस्तांच्या व्यथा पाहून आपणही त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, मदतीसाठी खारीचा उचलला पाहिजे या भावनेने विद्यार्थ्यांनी उचलेले हे मदतीचे पाऊल राज्यात प्रत्येक व्यक्तीला सामाजिक जाणिवा जागृत करुन चालण्याची शिकवण देणारे आहे. या विद्यालयातील पाचवीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. स्वरा दीपक नराळे हिने रेखाटलेल्या 'हरवलेलं सारं काही पुन्हा उभारुया एकजुटीने पुढे जाऊ या...' मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा..' या चित्रावर मुख्यमंत्र्यांनी स्वतः स्वाक्षरी करून आपल्या महाराष्ट्र राज्याला एवढ्या उदात्त दृष्टीकोनाने चालणारे भावी नागरिक मिळणार असल्याचे पाहून आपले मन भरून आल्याचे बोलून दाखविले. या विद्यार्थ्यांनी संपूर्ण राज्यापुढे मदत, सहकार्याचा एक नवा आदर्श निर्माण करण्याचे काम केल्याची प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

## मासेमारीच्या नव्या हंगामाला खराब ...

खोळंबली. ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असूनही खराब हवामान, वादळ आणि अतिवृष्टी यामुळे या दोन महिन्यांत पारंपरिक मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. परिणामी मासेमारीकरिता डिझेल, बर्फ, जाळी तथा अन्य साहित्य यावर झालेला खर्च अक्षरशः वाया गेला, त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. मासेमारीकरिता खर्च जास्त आणि केलेल्या मासेमारीतून उत्पन्न कमी अशी बिकट परिस्थिती पारंपरिक मच्छिमारांची झालेली आहे. याशिवाय मासेमारीच्या व्यवसायाशी संबंधित अन्य घटकही मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. या सर्वांचा सहानुभूतीने विचार करून शासनाने ताबडतोब मच्छिमारांना सानुग्रह अनुदान जाहीर करणे गरजेचे आहे, अशी भावना मच्छिमार समाजातून व्यक्त होऊ लागली आहे. यंदा अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांच्या तुकसानीचे पंचनामे करून त्यांच्याकरिता शासनाने मदतीची घोषणा केली आहे. लोकप्रतिनिधी बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करत आहेत. पारंपरिक मच्छिमारही मत्स्यशेती करतात. मात्र, लहरी हवामान, सततची अतिवृष्टी आणि वादळी वारे यामुळे मत्स्यशेती करणारे पारंपरिक मच्छिमारही हंगामाच्या सुरुवातीलाच आर्थिक गणित कोलमडल्याने संकटात सापडले आहेत. मात्र, किनाऱ्यावर येऊन पारंपरिक मच्छिमारांच्या नुकसानीची काय स्थिती आहे. याची एकाही लोकप्रतिनिधीने माहिती घेतलेली नाही, अशी खंत मिल्टन सौदिया यांनी व्यक्त केली आहे. सरकारने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा दिलेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्यशेती करणाऱ्या मच्छिमारांच्या नुकसानीचाही सहानुभूतीपूर्वक विचार करून पारंपरिक मच्छिमारांना शासनाने मदतीचा हात द्यावा, असेही सौदिया यांनी म्हटले आहे.

## महात्मा गांधीजींनी नावीन्यतेचा पुरस्कार...

चौकात लालबहादूर शास्त्री यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन झाली. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी हिरवा झेंडा दाखवून शांती रॅलीची सुरुवात केली. त्यानंतर या रॅलीचा समारोप महात्मा गांधी उद्यानात झाला. तेथील गांधीजींच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. व्यासपीठावरदेखील दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. गांधी उद्यानातील कार्यक्रमास प्रारंभी सर्वधर्मप्रार्थना झाली. त्यानंतर अनुभूती इंटरनॅशनल रेसीडेन्सीच्या विद्यार्थानी 'वैष्णव जन तो तेने कही ये...' भजन सादर केले. प्रास्तविक गांधी रिसर्च फाउंडेशनचे सहकारी आश्विन झाला यांनी केले. त्यात त्यांनी गांधी रिसर्च फाउंडेशन करत असलेल्या कार्याची माहिती दिली. गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुदर्शन आयंगार यांनी उपस्थितांना अंहिसेची शपथ दिली. सूत्रसंचालन गिरीश कुळकर्णी यांनी केले तर आभारप्रदर्शन चंद्रशेखर पाटील यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

देशभक्ती समूहगीत स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके : गांधी तीर्थ देशभक्ती समूहगीत गायन स्पर्धा ३० सप्टेंबर रोजी झाल्या होत्या. त्याचा निकाल आणि पारितोषिक वितरण आज झाले. शहरी विभागातून १३ व ग्रामीण भागातील ८ एकूण २१ संघांनी सहभाग घेतला होता. पहिल्या तीन विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. त्यात शहरी भागातून केशव स्मृती प्रतिष्ठान संचलित ब. गो. शानभाग विद्यालय (प्रथम), अनुभूती इंटरनॅशनल स्कूल (निवासी) (द्वितीय), विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लीश मीडियम स्कूल, वाघनगर (तृतीय) आणि उत्तेजनार्थ ओरियान इंग्लीश मीडियम स्कूल आणि पोदार स्कूलला मिळाले. ग्रामीण भागातून एल.एच.पाटील इंग्लीश मीडियम स्कूल, वावडदा (प्रथम), महात्मा गांधी विद्यायल, भादली (द्वितीय) आणि तृतीय स्वा. प.ध.थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद तर उत्तेजनार्थ आदर्श विद्यालय, कानळदा यांना देण्यात आले. महात्मा गांधी, अब्दुल कलाम यांच्या रुपात चिमुकले : सद्भावना शांती यात्रेत भारतातील थोर पुरुषांची व्यक्तीरेखा अनुभूती इंग्लीश मीडियम स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साकारली होती. ते रॅलीचे आकर्षण ठरले. त्यात युग नाथोने (लालबहादूर शास्त्री), आर्यन इंगळे (महात्मा गांधी), आराध्या पाटील (झाशीची राणी), कार्तिक मराठे (ए.पी.जे.अब्दुल कलाम), रोहन शेवाळे (पंडित नेहरु), इशानी चौधरी (इंदिरा गांधी), तेजस हटकर (नेताजी सुभाषचंद्र बोस) अशा विविध भूमिका साकारल्या होत्या.

## पालघरमध्ये अभिजात मराठी राजभाषा ...

उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रणजित देसाई यांनी केले तर माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांनी आभारप्रदर्शन करून सर्व शाळांना या सप्ताहात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांचा संकल्प करत हा शुभारंभ सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. आठवडाभर विविध उपक्रमांद्वारे मराठी भाषेचा गौरव साजरा केला जाणार आहे. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक आणि विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जतिन कदम आणि प्रतिभा कदम यांनी केले.

## भिवंडीत बनावट नोटांसह अग्निशस्त्र...

जाताना आढळून आल्याने कारची पंचांसमक्ष केलेल्या झडती कारवाईत गुन्हे शाखेने आरोपीं कडून लहान मुलांच्या खेळण्यातील ५०० रुपयांच्या बनावट नोटांचे ४८ बंडल, १ पिस्तूल, १ जिवंत काडतूस आणि इको फोर्ड गाडी असा एकूण ६ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून दोघांच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली आहे. दरम्यान सदर गुन्ह्याच्या प्राथमिक तपासात आरोपी हे जप्त नोटा खऱ्या भासवून बदली करण्याच्या प्रयत्नात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कोणीही अशा प्रकारच्या बनावट नोटा बदली करण्याच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन गुन्हे शाखेने नागरिकांना केले असून कुठे असा प्रकार आढळल्यास त्याबाबत तात्काळ संबंधित पोलिस ठाण्यास अथवा गुन्हे शाखेस तशी माहिती देण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

06 TO 12 OCTOBER 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 10/4/2025 8:26 PM Page 1



# दुचाकी चोरी करणारे तीन आरोपी पोलिसांच्या जाळ्यात



**उल्हासनगर : वार्ताहर**

उल्हासनगर शहरांमध्ये दुचाकी चोरणाऱ्या चोरांनी धुमाकूळ घातला होता, अशा तीन चोरांना उल्हासनगर मध्यवर्ती पोलिसांनी अटक केलीय. काही दिवसा अगोदर स्वस्तिक होंडा या शोरूम बाहेरून तीन मोटारसायकल चोरीस गेल्या होत्या. मालकाकडून मध्यवर्ती पोलीस ठाणे उल्हासनगर मध्ये तक्रार करण्यात आली होती. वरिष्ठांच्या मार्गदर्शन खाली या गुन्ह्याचा छळा लावण्यास पोलिसांना यश आले. या चोरांकडून चोरी केलेल्या तीन दुचाकी पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. काही दिवसांपूर्वी कॅम्प तीन च्या शांतीनगर परिसरात असलेल्या स्वास्तिक होंडा या शोरूम बाहेरून दुचाकी चोरीला गेल्या होत्या. त्याचा तपास करत असताना पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि सीसीटीव्हीच्या आधारे साहिल गोरे, सनी साळवे सुमित खोपटे या तिघांना अटक केली. त्यांच्याकडून चोरलेल्या ३ लाख ६० हजार रुपयांच्या तीन दुचाकी हस्तगत करण्यात आल्यात. दरम्यान या चोरांनी आणखीन किती अशा चोरीचे गुन्हे केले आहेत. यामागे एखादी टोळी सक्रिय आहे का याचा देखील पुढील तपास मध्यवर्ती पोलीस करत आहेत.

# पाकिस्तानातील ड्रग्सचा भारतात प्रवेश; विरार गुन्हे शाखा कक्ष ३ ची करवाई

**वसई : वार्ताहर**

देशभर पसरलेल्या अमली पदार्थांचे जाळे आता थेट पाकिस्तानपर्यंत पोहोचले आहे. राजस्थान सीमेलगत असलेल्या पाकिस्तानच्या एका छोट्या गावातून भारतात तस्करी करून अमली पदार्थ आणले जात असल्याचे गुन्हे शाखा ३ च्या पथकाने उघडकीस आणले आहे. गुन्हे शाखेने नुकतीच कारवाई करून ८ कोटींचे अमली पदार्थ जप्त केले होते. त्या तपासात ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. वसई विरार व मीरा भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थांची तस्करी होऊ लागली आहे. अशा अमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त निकेत कौशिक यांच्या मार्गदर्शनाखाली कारवायांच्या मोहिमा सुरू केल्या आहेत. ११ सप्टेंबर रोजी विरार गुन्हे शाखा कक्ष ३ च्या पथकाने फादरवाडी रेंजनाका रस्त्यावरील श्रीपाल टॉवर येथे सापळा रचून कारवाई करत समुंदरसिंग देवडा (४९), युवराजसिंग राठोड (२८), तकतसिंग राजपूत (३८) या तीन आरोपींना अटक केली होती. आरोपींकडून ८ कोटी ४ लाख ४०



हजार किंमतीचा २ किलो ११ ग्रॅम वजनाचा हेरॉईन नावाचा अमली पदार्थ जप्त करून त्यांच्यावर वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला होता. तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारे यातील अमली तस्करीतील मुख्य सूत्रधाराला राजस्थान मधील सिरोही येथून अटक केली आहे. हरिसिंह तेजसिंह रावलोटी भाटी (५५) असे या अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपींच्या विरोधात वालीव पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत. अटक करण्यात आलेला हरिसिंह हा आरोपी हा भारत पाकिस्तान सीमेलगत असलेल्या सतू या गावात राहतो. या अमली पदार्थांचा पुरवठा पाकिस्तानातून होत असल्याची कबुली त्याने पोलिसांना तपासा दरम्यान दिली आहे. हा आरोपी पाकिस्तान मधील अमली पदार्थ पुरवठादारांच्या संपर्कात असून जेसेलमेर सीमेजवळून हा तस्करी करीत होता असे विरार गुन्हे शाखा कक्ष ३ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे यांनी सांगितले आहे. जप्त केलेल्या हेरॉईन अमली पदार्थांची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात ८ कोटीहून अधिक असल्याचे त्यांनी सांगितले आहे. ही कारवाई विरारच्या गुन्हे शाखा कक्ष ३ चे पोलीस निरीक्षक शाहूराज रणवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, आदींच्या पथकाने केली. मीरा भाईंदर व वसई विरारमध्ये तेलंगणा राज्यातून अमली पदार्थांची तस्करी होत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले होते याच पार्श्वभूमीवर तेलंगणा राज्यात गुन्हे शाखेच्या पथकाने छापेमारी करून कारखाने उध्वस्त केले होते. यात सुमारे ६ हजार किलो ग्रॅम वजनाचे मॅफेड्रोन अमली पदार्थ जप्त केले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर या अमली पदार्थांची किंमत १२ हजार कोटी इतकी होती. पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील सर्वात मोठी कारवाई होती.

पान १ वरून....

## पत्नीला समजवण्याचा प्रयत्न फोल...

कुणकुण प्रशांतला लागलेली होती. आपल्या माघारी ती त्याला भेटत असते आपण घरी नसताना तिचा प्रियकर घरी येवून तिच्याशी मजा मारत असतो हे त्याला कोणाकडून तरी समजले होते. त्यामुळे तो रोज दारू पिऊन आला की, तिला मारझोड करून तुझा यजमान कोण आहे? मला तरी कळू दे. तु त्याच्याबरोबर मजा मारणार आणि मला उपाशी ठेवणार असे म्हणत तो तिला नको नको ते बोलत होता. काजल ही देखणी आणि सुदंर असल्याने देखणी बायको दुसऱ्याची असते हे त्याच्या मनात बसले होते. त्यामुळे तो रोज उठ सुठ तिच्या चारित्र्यावर संशय घेत तिला घाण घाण शिव्या देत होता. त्यामुळे त्याच्या मारहाणीला कंटाळून ती माहेरी मलकापुर येथे जात होती. ती माहेरी गेली की आठ पंधरा दिवस सांगलीला परत येत नव्हती. त्यामुळे त्याच्या मनात भलते सलते येत होते.ती माहेरी जावून प्रियकराबरोबर मजा मारत असेल म्हणून ती भांडण करून एकदा गेली की, आठ पंधरा दिवस परत येत नाही हे त्याच्या डोक्यात होते. काजल आणि त्याची भांडणे तिच्या माहेरच्या लोकांनी बऱ्याच वेळेला मिटवली होती. भांडणात त्यांनी काजल हिला समजावून सांगण्यापेक्षा प्रशांतलाच तु दारू पितोस म्हणून तुझ्या डोक्यात नाही ते विचार येतात म्हणून त्याचीच खरडपट्टी काढली होती.त्यामुळे तो पत्नी काजल आणि तिच्या माहेरच्या लोकावर ही चिडत होता. सांगलीत तर त्याची भांडणे नित्याचीच झालेली होती. शेजाऱ्यांनी ही त्याची भांडणे मिटवण्याचा प्रयत्न केला परंतु काही केल्या नवरा बायकोची भांडणे काही मिटत नव्हती. उलट दिवसे दिवस ती भांडणे वाढतच चालली होती. हल्ली काजल ही दिवस दिवस कोणाबरोबर तरी मोबाईलवरून बोलत असायची. ती ज्याच्याशी मोबाईलवरून बोलत असायची तो तरूण प्रशांतच्या माघारी त्यांच्या घरी येत जात होता. परंतु तो तरूण नेमका कोण आहे हे प्रशांतला माहित नव्हते. त्यामुळे तो हवेतच गोळ्या मारल्यागत करीत होता. काजल आणि त्या तरूणाच्या संबंधाची चर्चा ही शेजाऱ्यात ही होऊ लागली होती. त्यामुळे ही चर्चा त्याच्या कानावर आली की त्याच्या तळ पायाची आग मस्तकात जात होती. काजलचे दोन्ही मुलींच्याकडे लक्ष नव्हते हे ही त्याच्या लक्षात येत होती. त्याची एक मुलगी सहा वर्षाची तर दुसरी चार वर्षाची असल्याने त्या तशा लहानच असल्याने त्यांना काय आई बाबांचे भांडण समजणार घरात आई वडिलांचे भांडणे सुरू झाली की, त्या दोन्ही लहान मुली मोठ्याने रडत असायच्या. काजल ही भांडणात त्याच्या जवळच मुलींना सोडून जात असल्याने त्याची देखभाल करताना ही त्याच्या नाकी नऊ येत होते. त्यामुळे त्याची जास्तच चिडचड होत होती. तिला संसाराचे काहीच नाही. उलट ती प्रियकराबरोबर मजा मारायला मोकळी असते हे त्याने ओळखले होते. भांडणात तो तिला रोज तु तुझ्या याराकडे जा माझ्या संसारातून निघून जा असे म्हणत होता. हल्ली भांडणात ती ही त्याला उलट बोलत होती. त्याच्या मर्दानगीवर बोट ठेवीत तु मला जे काही देवू शकत नाहीस ते मला माझा प्रियकर देतो असे म्हणत ती आपले विवाहबाहय संबंध मान्य करीत होती. त्यातच त्याचे डोके सटकत होते. अशातच गेल्या महिन्यात काजल ही नवरा प्रशांत याला न सांगता घरातून बाहेर भांडण करून गेली होती. त्याने तिचा शोध तिच्या माहेरी ही घेतला परंतु ती तेथे नव्हती. मग ती गेली कुठे असा प्रश्न त्याला पडला होता. त्याला समजले की आपली पत्नी ही तिच्या प्रियकरासोबत दुसरीकडेच राहत आहे. त्यामुळे प्रशांत हा दारू पिऊन आपल्या सासरवाडीत जावून त्याच्याबरोबर भांडण करू लागला होता. त्यावेळी तिच्या माहेरच्या लोकांनी तिचा शोध घेऊन तिची ही समजूत काढून तिला प्रशांत बरोबर सांगलीला परत पाठवले होते. ती नुकतीच दोन तीन दिवस झाले असतील सांगलीला येवून तोच त्याचे पुन्हा मागचे तसे पुढे चालू झाले होते. या दोन तीन दिवसात त्याने काजलला तु कोणाबरोबर कुठे गेली होतीस याचा जाब विचारून हैराण करून टाकले होते. त्याने तिला किती ही मारहाण केली तरी तिने त्याचा मार खावून आपण कोणाबरोबर कुठे गेलो होतो हे काहीच सांगितले नाही आपली बायको आठ पंधरा दिवस बाहेर राहून दुसऱ्यासोबत शेण खावून आली आहे हे त्याने ओळखले. त्याच्या मनात तिच्या विषयी भयंकर राग आलेला होता. आता हिचा गोड बोलूनच काटा काढयाचा याचा त्याने विचार केला. घटनेच्या आदल्या रात्री नवरा बायकोनी बेडवर आपली रात्र रंगीन करीत आता आपण चांगले राहयचे. भांडण करायचे नाही असे ठरविले. प्रशांत ही त्या रात्री तिच्याशी गोड बोलत होता.त्याने तिच्याबरोबर मनसोक्त शरीरसुख घेतले. परंतु हे शरीर सुख घेत असताना ही बाहेर शेण खावून आली आहे हे त्याच्या डोक्यातील काही जात नव्हते. तिच्याबरोबर मजा मारून झाल्यावर तो शांत झोपण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु तिच्या बाबत असणारी डोक्यातील किड काही जात नव्हती. बेडवर तो रात्र भर या कुशी वरून त्या कुशीवर करीत होता. दुसऱ्या दिवशी तो सकाळी लवकर उठला आंघोळ वैगरे करून मी कामाला जातो असे सांगून घराच्या बाहेर पडला. परंतु तो काही त्यावेळी कामावर गेला नाही. आज रविवार आहे कशाला कामाला जायचे हा विचार मनात करून तो सकाळी १० वाजणेच्या दरम्यान कामावर न जाता घराकडे दारू पिऊनच आला. सकाळी सकाळी तो दारू पिऊन घरात आल्यावर काजल हिचे डोके सणकले. ती त्याच्यावर ओरडू लागली. दोघांची भांडणे सुरू झाली. ती घरातील कामे करीत होती. भांडता भांडता तिने घरातील कामे आटोपली. तशी ती रागाच्या फणकरातच बेडवर जावून झोपली. तिला तशी झोप काही लागली नव्हती. तिला बेडवर गाऊनवर झोपलेली बघून प्रशांतचे डोके हादरले. इथे कशाला माझ्या बेडवर झोपतेस तुझ्या याराबरोबर जावून झोप जा असे त्याने तिला रागात म्हटले. त्यावर ती चिडली.ती ही त्याला शिव्या घालू लागली. दोघांची भांडणे वाढतच चालली भांडता भांडता तिने झोपेचे सोंग घेतले. तिच्यावर तो चिडला होताच.त्याने स्वयंपाक घरात जावून चाकू आणला आणि उताणी झोपलेल्या काजलच्या गळ्यावर सरर्कन फिरविला.तसे तिचा गळा चिरला गेल्याने त्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला. तिचा गळा चिरल्यावर तो काही शांत झाला नाही त्याने त्याच चाकूने परत तिच्या मानेवर हातावर आणि पोटावर सपासप वार केले. ती ओरडत होती पण त्याने दार लावून घेतल्याने तिच्या ओरडण्याचा आवाज बाहेर गेला नाही. तिच्या शरीरातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने तिचा जागीच मृत्यु झाला. तिचा आपल्या हातून खून झाला आहे हे त्याच्या लक्षात आल्यावर त्याची दारू उतरली. तो आपल्या दोन्ही लहान मुलीना घेतले आणि शेजारी काही अंतरावर राहत असलेल्या आपल्या आईच्या घरात सोडले. तो कोणालाच काही बोलला नाही. तो परत आपल्या घराकडे आला. त्याने घराला बाहेरून कडी लावली आणि तडक सांगली शहर पोलीस स्टेशन गाठले. पोलीस स्टेशनमध्ये जावून त्याने स्वत:ला आत्मसमर्पण करीत मी माझ्या बायकोचा चारित्र्याच्या संशयातून खून केल्याचे त्याने हजर असलेल्या पोलीसांना सांगितले.त्याच्याकडून खूनाची ही माहिती ऐकून पोलीस ही हादरून गेले. त्यांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला घेऊन पोलीसांनी शांतीनगर येथील घटनास्थळ गाठले.पोलीसांनी घराचा दरवाजा उघडून आत पाहिले तर बेडवर त्याची पत्नी काजल ही रक्ताच्या थारोळ्यात पडली होती. बाजुलाच रक्ताने माखलेला चाकू ही पडला होता.

घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देवून घटनेची पाहणी केली. त्यांनी पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह सांगली सिव्हिल हॉस्पिटल येथे शवविच्छेदनसाठी पाठवून दिला. उतरीय तपासणीनंतर संध्याकाळी उशिरा काजल हिचा मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात अंतिम संस्कारासाठी दिला. या घटनेची लेखी फिर्याद मयत काजल हिच्या भावाकडून घेण्यात आली. त्याने दिलेल्या फिर्यादीप्रमाणे काजल प्रशांत एडके (वय २४) रा.सांगली. हिच्या खून प्रकरणी तिचा पती प्रशांत एडके (वय ३०) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०१(१) प्रमाणे गुन्हा दाखल केला. पोलीसांनी त्याला सोमवारी कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.या दरमन्यान पोलीसांनी प्रशांत ऐडके याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास सांगली शहर पोलीस स्टेशनचे पो.निरी.संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहेत.

पान ८ वरून....

## १४ वर्षांचा वनवास भोगायला लावणाऱ्या...

झाले असल्याचा आरोप प्रमोद पवार यांनी केला आहे. विशेष म्हणजे या रस्त्यावरील ठेकदार जिजाऊ कन्स्ट्रक्शन, मयुर कन्स्ट्रक्शन, हर्षल गंधे, निलेश अंबावणे या ठेकेदारांनी शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून दुरुस्तीचा पैसे लाटत दुरुस्ती कामामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप प्रमोद पवार यांनी केला आहे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन या ठेकेदार कंपनीवर विधान परिषदेत काळ्या यादीत टाकण्याची घोषणा केली पण त्या नंतर ही या कंपनीला ४६ कोटी रुपयांचे दुरुस्तीचे काम पुन्हा देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांना बक्षिसी दिली आहे. रस्ते दुरुस्तीचे दायित्व २०२९ पर्यत असताना ती दुरुस्ती न करता ठेकेदारांना नव्या कोट्यावधी रुपयांच्या खिरापत ठेकेदारांना दिली. शासनाने या संपूर्ण रस्त्याच्या काँक्रिट करणाचे ८०३ कोटी रुपयांचे काम ईगल कन्स्ट्रक्शन या ठेकदारास दिले.पण त्याचे ही काम संथ गतीने सुरू आहे.

या रस्त्याचे दुरुस्ती कामात भ्रष्टाचार करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करावी.विधान परिषदेतील काळ्या यादीत ठेकेदारास टाकण्याच्या घोषणेची अंमलबजावणी करावी.या रस्त्याची श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी व सध्या काम दिलेल्या ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीने तत्काळ काम करावे अशा मागण्यां प्रमोद पवार यांनी केल्या असून मागण्यांची पूर्तता होत नाही तोपर्यत हा लढा सुरू राहील असा निर्धार शेवटी प्रमोद पवार यांनी व्यक्त केला आहे.या औरंगी चोख असा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## दैनंदिन जीवनात राष्ट्राला प्राधान्य ...

होईल ते ते करणे आवश्यक असल्याचे सांगितले. देश आणि देशाच्या सीमेचे संरक्षण करणे म्हणजेच राष्ट्र प्रथम हे कर्तव्य बजावणे आहे असे नाही तर देशातील शोषित, वंचित आणि गरजवंताना निस्वार्थ भावनेतून मदतीचा हात पुढे करणे हे सुद्धा राष्ट्र प्रथम या संकल्पनेअंतर्गत येत असल्याचे अधोरेखित केले. पंतप्रधान मोदी यांनी आपल्या प्रत्येक विचारातून आणि कृतीतून ज्या पद्धतीने देशहिताला प्राधान्य दिले आहे त्याच पद्धतीने प्रत्येक नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात देशहिताचा विचार करून राष्ट्राला प्राधान्य देणारे कार्य केल्यास निश्चितच आपला भारत आत्मनिर्भर होऊन जगातील महासत्ता बनेल असा विश्वास डॉ.लहाने यांनी यावेळी व्यक्त केला. मात्र यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात राष्ट्राला प्राधान्य देणारे कार्य करावे असे आवाहन डॉ.तात्याराव लहाने यांनी यावेळी केले. राष्ट्र प्रथम या भावनेतून कार्य करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जगभरात देशाचा सन्मान वाढवण्याचे काम केले असल्याचे सांगून माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले कि देशातील प्रत्येक समाजातील नागरिकांच्या हिताचा विचार करून आपल्या राष्ट्राला अधिक बळकट करण्यासाठी कार्य करण्याचा जो संदेश पंतप्रधान मोदी सातत्याने घेत आहेत या संदेशानुसार केवळ भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी नव्हे तर देशातील प्रत्येक नागरिकांनी कार्य करावे असे आवाहन माजी मंत्री आ.निलंगेकर यांनी यावेळी केले. या मेळाव्याला संबोधित करताना आ.अभिमन्यू पवार यांनी शहर जिल्हा भाजपच्या वतीने सेवा पंधरवाडा अंतर्गत जे कार्यक्रम झाले आहेत ते निश्चितच पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या विचारांना अपेक्षित असल्याचे सांगून या माध्यमातून आपण सर्वांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शतायुष्यासाठी प्रार्थना करावी अशी अपेक्षा व्यक्त केली. राष्ट्र प्रथम या संकल्पनेनुसार कार्य करत विकसित भारताचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जो संकल्प केला आहे तो संकल्प पुर्ण करत असताना प्रत्येक नागरिकांनी आपल्या हृदयात राष्ट्र प्रथम ही भावना रुजवणे आवश्यक असल्याचे भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी सांगितले आहे. विकसित भारत घडत असताना प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी कर्तव्य भावनेतून निभावली तर विकसित भारताची सुरु झालेली आपली घोडदौड निश्चितच पुर्णत्वास जाईल असा विश्वास भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी व्यक्त केला. या मेळाव्यात डॉ.विठ्ठल लहाने, ॲड.शैलेश गोजमगुंडे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मेळाव्याचे सहसंयोजक मनोज सुर्यवंशी तर सुत्रसंचलन अब्दुल गालिब शेख यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतमातेचे पुजन करण्यात आले तर सांगता राष्ट्रगीताने झाली. सदर मेळावा यशस्वी करण्यासाठी सेवा पंधरवाड्याचे शहर जिल्हा संयोजक अमोल गीते, सहसंयोजक संजय गिर, रविशंकर लवटे, मेळाव्याचे संयोजक प्रा.उदय देशपांडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## डॉ.हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या ...

कृती प्रत्येकासाठी प्रेरणादायी असल्याच्या भावना त्यांनी व्यक्त केल्या. संस्थेचे संस्थापक निवृत्ती यादव यांनी यावेळी आपल्या संस्थेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. संस्थेच्या वतीने आतापर्यंत वेळोवेळी नैसर्गिक आणि राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी संस्थेच्या वतीने सर्वतोपरी आर्थिक सहायता करण्यासाठी पुढाकार घेतला जात सल्याचे सांगितले. दरम्यान राज्यातील आपदग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस सहाय्यता करण्याचे आवाहन केले जाते आणि त्याला नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळतो, ही बाब खरी असली तरी अहमदपूरच्या डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थांनी पुरग्रस्तांच्या मदतीसाठी चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून निधी संकलित केल्याचे पाहून आपणास अतिशय समाधान वाटल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. शासनाने आवाहन केले आहे म्हणून नव्हे तर पुरग्रस्तांच्या व्यथा पाहून आपणही त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे, मदतीसाठी खारीचा उचलला पाहिजे या भावनेने विद्यार्थ्यांनी उचलेले हे मदतीचे पाऊल राज्यात प्रत्येक व्यक्तीला सामाजिक जाणिवा जागृत करुन चालण्याची शिकवण देणारे आहे. या विद्यालयातील पाचवीमध्ये शिकणारी विद्यार्थिनी कु. स्वरा दीपक नराळे हिने रेखाटलेल्या 'हरवलेलं सारं काही पुन्हा उभारुया एकजुटीने पुढे जाऊ या...' मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा..' या चित्रावर मुख्यमंत्र्यांनी स्वतः स्वाक्षरी करून आपल्या महाराष्ट्र राज्याला एवढ्या उदात्त दृष्टीकोनाने चालणारे भावी नागरिक मिळणार असल्याचे पाहून आपले मन भरून आल्याचे बोलून दाखविले. या विद्यार्थ्यांनी संपूर्ण राज्यापुढे मदत, सहकार्याचा एक नवा आदर्श निर्माण करण्याचे काम केल्याची प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केली.

## मासेमारीच्या नव्या हंगामाला खराब ...

खोळंबली. ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असूनही खराब हवामान, वादळ आणि अतिवृष्टी यामुळे या दोन महिन्यांत पारंपरिक मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. परिणामी मासेमारीकरिता डिझेल, बर्फ, जाळी तथा अन्य साहित्य यावर झालेला खर्च अक्षरशः वाया गेला, त्यामुळे पारंपरिक मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. मासेमारीकरिता खर्च जास्त आणि केलेल्या मासेमारीतून उत्पन्न कमी अशी बिकट परिस्थिती पारंपरिक मच्छिमारांची झालेली आहे. याशिवाय मासेमारीच्या व्यवसायाशी संबंधित अन्य घटकही मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. या सर्वांचा सहानुभूतीने विचार करून शासनाने ताबडतोब मच्छिमारांना सानुग्रह अनुदान जाहीर करणे गरजेचे आहे, अशी भावना मच्छिमार समाजातून व्यक्त होऊ लागली आहे. यंदा अतिवृष्टीमुळे पिके पाण्याखाली गेल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झालेले आहे. त्यांच्या तुकसानीचे पंचनामे करून त्यांच्याकरिता शासनाने मदतीची घोषणा केली आहे. लोकप्रतिनिधी बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करत आहेत. पारंपरिक मच्छिमारही मत्स्यशेती करतात. मात्र, लहरी हवामान, सततची अतिवृष्टी आणि वादळी वारे यामुळे मत्स्यशेती करणारे पारंपरिक मच्छिमारही हंगामाच्या सुरुवातीलाच आर्थिक गणित कोलमडल्याने संकटात सापडले आहेत. मात्र, किनाऱ्यावर येऊन पारंपरिक मच्छिमारांच्या नुकसानीची काय स्थिती आहे. याची एकाही लोकप्रतिनिधीने माहिती घेतलेली नाही, अशी खंत मिल्टन सौदिया यांनी व्यक्त केली आहे. सरकारने मत्स्यव्यवसायाला कृषीचा दर्जा दिलेला आहे त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच मत्स्यशेती करणाऱ्या मच्छिमारांच्या नुकसानीचाही सहानुभूतीपूर्वक विचार करून पारंपरिक मच्छिमारांना शासनाने मदतीचा हात द्यावा, असेही सौदिया यांनी म्हटले आहे.

## महात्मा गांधीजींनी नावीन्यतेचा पुरस्कार...

चौकात लालबहादूर शास्त्री यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन झाली. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी हिरवा झेंडा दाखवून शांती रॅलीची सुरुवात केली. त्यानंतर या रॅलीचा समारोप महात्मा गांधी उद्यानात झाला. तेथील गांधीजींच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. व्यासपीठावरदेखील दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. गांधी उद्यानातील कार्यक्रमास प्रारंभी सर्वधर्मप्रार्थना झाली. त्यानंतर अनुभूती इंटरनॅशनल रेसीडेन्सीच्या विद्यार्थांनी 'वैष्णव जन तो तेने कही ये...' भजन सादर केले. प्रास्तविक गांधी रिसर्च फाउंडेशनचे सहकारी आश्विन झाला यांनी केले. त्यात त्यांनी गांधी रिसर्च फाउंडेशन करत असलेल्या कार्याची माहिती दिली. गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. सुदर्शन आयंगार यांनी उपस्थितांना अंहिसेची शपथ दिली. सूत्रसंचालन गिरीश कुळकर्णी यांनी केले तर आभारप्रदर्शन चंद्रशेखर पाटील यांनी मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

देशभक्ती समूहगीत स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके : गांधी तीर्थ देशभक्ती समूहगीत गायन स्पर्धा ३० सप्टेंबर रोजी झाल्या होत्या. त्याचा निकाल आणि पारितोषिक वितरण आज झाले. शहरी विभागातून १३ व ग्रामीण भागातील ८ एकूण २१ संघांनी सहभाग घेतला होता. पहिल्या तीन विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. त्यात शहरी भागातून केशव स्मृती प्रतिष्ठान संचलित ब. गो. शानभाग विद्यालय (प्रथम), अनुभूती इंटरनॅशनल स्कूल (निवासी) (द्वितीय), विवेकानंद प्रतिष्ठान इंग्लीश मीडियम स्कूल, वाघनगर (तृतीय) आणि उत्तेजनार्थ ओरियान इंग्लीश मीडियम स्कूल आणि पोदार स्कूलला मिळाले. ग्रामीण भागातून एल.एच.पाटील इंग्लीश मीडियम स्कूल, वावडदा (प्रथम), महात्मा गांधी विद्यायल, भादली (द्वितीय) आणि तृतीय स्वा. प.ध.थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद तर उत्तेजनार्थ आदर्श विद्यालय, कानळदा यांना देण्यात आले. महात्मा गांधी, अब्दुल कलाम यांच्या रुपात चिमुकले : सद्भावना शांती यात्रेत भारतातील थोर पुरुषांची व्यक्तीरेखा अनुभूती इंग्लीश मीडियम स्कूलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी साकारली होती. ते रॅलीचे आकर्षण ठरले. त्यात युग नाथोने (लालबहादूर शास्त्री), आर्यन इंगळे (महात्मा गांधी), आराध्या पाटील (झाशीची राणी), कार्तिक मराठे (ए.पी.जे.अब्दुल कलाम), रोहन शेवाळे (पंडित नेहरु), इशानी चौधरी (इंदिरा गांधी), तेजस हटकर (नेताजी सुभाषचंद्र बोस) अशा विविध भूमिका साकारल्या होत्या.

## पालघरमध्ये अभिजात मराठी राजभाषा ...

उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रणजित देसाई यांनी केले तर माध्यमिक शिक्षणाधिकारी अशोक पाटील यांनी आभारप्रदर्शन करून सर्व शाळांना या सप्ताहात सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांचा संकल्प करत हा शुभारंभ सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. आठवडाभर विविध उपक्रमांद्वारे मराठी भाषेचा गौरव साजरा केला जाणार आहे. यावेळी विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक आणि विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जतिन कदम आणि प्रतिभा कदम यांनी केले.

## भिवंडीत बनावट नोटांसह अग्निशस्त्र...

जाताना आढळून आल्याने कारची पंचांसमक्ष केलेल्या झडती कारवाईत गुन्हे शाखेने आरोपीं कडून लहान मुलांच्या खेळण्यातील ५०० रुपयांच्या बनावट नोटांचे ४८ बंडल, १ पिस्तूल, १ जिवंत काडतूस आणि इको फोर्ड गाडी असा एकूण ६ लाख ३३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला असून दोघांच्या विरोधात निजामपूरा पोलिस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून दोघांनाही अटक केली आहे. दरम्यान सदर गुन्ह्याच्या प्राथमिक तपासात आरोपी हे जप्त नोटा खऱ्या भासवून बदली करण्याच्या प्रयत्नात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे कोणीही अशा प्रकारच्या बनावट नोटा बदली करण्याच्या आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन गुन्हे शाखेने नागरिकांना केले असून कुठे असा प्रकार आढळल्यास त्याबाबत तात्काळ संबंधित पोलिस ठाण्यास अथवा गुन्हे शाखेस तशी माहिती देण्याचे आवाहन नागरिकांना केले आहे.

06 TO 12 OCTOBER 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 10/4/2025 8:27 PM Page 1



# दैनंदिन जीवनात राष्ट्राला प्राधान्य देणारे कार्य घडावे

## पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांचे प्रतिपादन



**लातूर : वार्ताहर**

देश व देशाच्या सीमांचे संरक्षण करणे म्हणजेच राष्ट्र प्रथम या कर्तव्याची पुर्तता होत नाही. राष्ट्र प्रथम हे कर्तव्य बजावत असताना देशांतर्गत असलेल्या गोरगरिबांची निस्वार्थ सेवा आणि गरजवंताना मदतीचा हात पुढे करणे याला सुद्धा तितकेच महत्व आहे. आपल्या दैनंदिन जीवनात अशा प्रकारच्या अनेक संधी आपल्याला मिळत असतात आणि या संधीचा फायदा घेत प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात राष्ट्राला प्राधान्य देणारे कार्य घडवावे असे आवाहन पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांनी केले आहे. लातूर शहर जिल्हा भाजपच्या वतीने बुधवार दि ०१ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित होत असलेल्या सेवा पंधरवाडा अंतर्गत बुद्धीजीवी मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले होते. या मेळाव्यात राष्ट्र प्रथम या विषयावर व्याख्यान देताना जगप्रसिद्ध नेत्रतज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार, माजी खा.डॉ.सुनील गायकवाड, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी, देविदास काळे, प्रदेश सांस्कृतिक सेलचे संयोजक ॲड. शैलेश गोजमगुंडे, डॉ.विश्वास कुलकर्णी, डॉ.विठ्ठल लहाने, प्रा.शिवराज मोटेगावकर, जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड.योगेश जगताप, डॉ. ज्योती सुळ, डॉ.संदिपान साबदे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केवळ आणि केवळ देशाचा विचार करत देशाला केवळ प्रगतीपथावर नेण्याचे काम केले नाही तर देश सुरक्षित आणि विकसित करण्याचा संकल्प ही पुर्णत्वास नेण्याचे कार्य सुरु केले असल्याचे सांगून डॉ. तात्याराव लहाने म्हणाले कि राष्ट्राप्रथम ही भावना पंतप्रधान मोदी यांच्यात लहानपणापासूनच रुजली असल्याचे स्पष्ट केले. राष्ट्र प्रथम या भावनेमुळेच पंतप्रधान मोदी यांना हे शक्य होत असल्याचे सांगितले. पंतप्रधान मोदी यांना हे जर शक्य होत असेल तर देशातील नागरिकांनाही हे सहज शक्य असल्याचे सांगून डॉ. लहाने म्हणाले कि राष्ट्र प्रथम या कर्तव्याला जागत असताना देशातील प्रत्येक नागरिकांनी देशहिताचा विचार कायम आपल्या मेंदूत आणि हृदयात कोरून ठेवला पाहिजे. राष्ट्र प्रथम ही भावना नसून कर्तव्य आहे हे लक्षात घेऊन प्रत्येकाने आपापल्या परीने जे जे शक्य ...पान ६ वर

# १४ वर्षांचा वनवास भोगायला लावणाऱ्या भिवंडी-वाडा खड्डेमय रस्त्याच्या दुरावस्थेविरोधात आमरण उपोषण सुरु




**भिवंडी : वार्ताहर**

भिवंडी वाडा मनोर या ६४ किमी लांबीच्या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे मागील १४ वर्षापासून या मार्गा वरून प्रवास करणारी स्थानिक जनता प्रवासी वाहन चालक त्रस्त झाले आहेत. जणू काही वनवास सुरू आहे.या रस्त्यावरील दुरावस्थे विरोधात भिवंडी जनआंदोलन समितीच्या नेतृत्वाखाली प्रमोद पवार यांनी अंबाडी नाका येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. या आंदोलनात पंचक्रोशीतील अनेक सामाजिक राजकीय संस्थांनी पाठिंबा व्यक्त केला आहे. २०१० मध्ये बीओटी तत्वावर विकसित या रस्त्यावर ठेकेदार सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने या रस्त्याच्या निगा व दुरुस्ती कडे दुर्लक्ष केल्याने अनेक खड्डे या रस्त्यांवर पडून अनेकांना प्राण गमवावे लागले. त्या विरोधात अनेक आंदोलन झाली. त्याची गंभीर दखल घेत शासनाने टोल वसुली बंद करून रस्ता २०१९ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केला. मात्र त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर आज पर्यंत १५० कोटी खड्डे दुरुस्तीसाठी खर्च केले. पण आज ही या रस्त्यावरील प्रवास खड्ड्यांमुळे मरणयातना भोगायला लावणारा आहे.या रस्त्यावर पोलिस दप्तरी २०१९ पासून आज पर्यंत खड्ड्यांमुळे ८५ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पण मागील १४ वर्षांत या रस्त्यावर आता पर्यंत ६०० जणांचे मृत्यू ...पान ६ वर

# डॉ.हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्यांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ लाख ११ हजार सुपूर्द



**अहमदपूर : वार्ताहर**

येथील डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयातील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अतिवृष्टीग्रस्तांसाठी 'ओले रंग' या चित्र प्रदर्शनातून १ लाख ११ हजार १११ रुपयांची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी सुपूर्द केली. डॉ. हरिवंशराय बच्चन विद्यालयाच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी लातूर जिल्हा परिषदेच्या स्थायी समिती सभागृहात पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 'ओले रंग' चित्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या चित्र प्रदर्शनास अतिशय उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून आलेल्या १ लाख ११ हजार १११ रुपयांच्या रकमेचा धनादेश संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती यादव यांनी विद्यार्थ्यांसमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस संवेदनशील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या या कृतीने अक्षरशः भारावून गेले. आपदग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेऊन या विद्यार्थ्यांनी केलेली...पान ६ वर

### गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे महात्मा गांधीजींची जयंती उत्साहात साजरी

# महात्मा गांधीजींनी नावीन्यतेचा पुरस्कार केला, आपणही करु या -जिल्हाधिकारी आयुष प्रसाद

**जळगाव : वार्ताहर**

महात्मा गांधी यांचे संपूर्ण जीवन आलौकीक होते. गांधीजींनी तीन तत्वांचा जीवनात आंगीकार केला. त्या तत्वांवरच संपूर्ण जगाला अंहिसेचा मंत्र मिळाला. केवळ उद्योगातच नव्हे तर समाजकारण, राजकारण आणि दैनंदिन जीवनात महात्मा गांधीजींनी नावीन्यतेला (इनोव्हेशन) महत्त्व दिले. प्रत्येक विषयांवर त्यांनी सखोल चिंतन केले. मतभेदांवरही ते खुलेपणाने चर्चा करत होते. दुसऱ्यास बदलण्याऐवजी त्यांनी स्वत:मध्ये बदल केला. जसे धागेधागे विणून वस्त्र तयार होते त्याचप्रमाणे माणसांमाणसांना जोडून देश बनतो, असे विचार जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले. गांधी रिसर्च फाउंडेशनतर्फे गुरुवारी विश्व अहिंसा दिवस, चरखा जयंती, राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त अंहिसा सद्भावना शांती रॅलीचे आयोजन केले होते. यावेळी व्यासपीठावर खा. स्मिता वाघ, आ. राजूमामा भोळे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, कवयित्री बहिणाबाई चौधरी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्हि. एल. माहेश्वरी, मनपा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे, राजेंद्र मयूर,




डॉ.सुदर्शन अयंगार, अनिल जैन, सौ. ज्योती जैन, गीता धर्मपाल, अंबिका जैन या मान्यवरांची उपस्थिती होती. त्याप्रमाणे या रॅलीत अतुल जैन, डॉ.भावना जैन, जैन परिवारातील सदस्य, अनिश शहा, शिरीष बर्वे यांच्यासह जैन इरिगेशन, गांधीतीर्थचे सहकारी, अनुभूती निवासी आणि इंग्लीश मीडियम स्कूलचे विद्यार्थी तसेच शहरातील इतर शाळांचे विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते. जिल्हाधिकारी आयुषप्रसाद म्हणाले की, महात्मा गांधी यांनी सर्वव्यापी विचार मांडले आहेत. एक व्यक्ती एखाद्या क्षेत्रातच पारंगत असतो, परंतु महात्मा गांधी हे अनेक विषय आणि क्षेत्रात पारंगत होते. सर्वच क्षेत्रात आपले योगदान दिले. दुसऱ्यांना बदलण्यापूर्वी स्वत:मध्ये ते बदल घडवत होते. महात्मा गांधी यांच्यापूर्वी ज्या ज्या क्रांती झाल्या. परंतु केवळ महात्मा गांधींजी यांनीच अंहिसेच्या माध्यमातून क्रांती घडवली. अहिंसेनेच त्यांनी जगात बदल घडवून आणला. गांधीजींचे विचार आपण आपल्या जीवनात अवलंबू या, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात शास्त्री टॉवर ...पान ६ वर

# मासेमारीच्या नव्या हंगामाला खराब हवामानाचा मोठा फटका

## कोळी युवाशक्ती संघटनेची सानुग्रह अनुदानाची मागणी

**वसई : वार्ताहर**

पावसाळी मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या मासेमारीच्या नव्या हंगामाला अतिवृष्टी, वादळी वारे यांचा जबरदस्त फटका बसला आहे. हंगामाच्या सुरुवातीलाच पारंपरिक मच्छिमारांना अनपेक्षित नैसर्गिक संकटांचा सामना करावा लागल्याने ऑगस्ट-सप्टेंबर हे मासेमारीकरिता पोषक महिने असूनही खराब हवामानामुळे या दोन महिन्यांत पारंपरिक मच्छिमारांना पूर्ण क्षमतेने मासेमारी करता आली नाही. परिणामी, मच्छिमारांचे आर्थिक गणित कोलमडले असून मच्छिमारांना शासनाने सानुग्रह अनुदान जाहीर करावे, अशी मागणी कोळी युवाशक्ती संघटनेचे अध्यक्ष मिल्टन सौदिया यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तथा मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली आहे. १ जून ते ३१ जुलै अशी ६१ दिवसांची विधिमान्य पावसाळी मासेमारी बंदी संपुष्टात आल्यानंतर १ ऑगस्टपासून नव्या मासेमारी हंगामाला





सुरुवात झाली. मासेमारीकरिता मच्छिमारांनी बोटी पाण्यात उतरवल्या त्यावेळी वातावरण काहीसे शांत दिसत होते. त्यामुळे नव्या हंगामात चांगल्या प्रकारे मासेमारी करता येईल, अशी अपेक्षा असतानाच नारळी पौर्णिमेनंतर अचानक वादळी हवामान आणि अतिवृष्टी सुरू झाली. त्यामुळे मासेमारीत काही दिवसांचा खोळंबा आला. त्यानंतर मासेमारी सुरू झाली. मात्र, पुन्हा गौरी-गणपतीच्या काळात खराब हवामानामुळे मासेमारी खोळंबली. वादळी हवामानामुळे बोटी समुद्रात अडकल्या. मासेमारी ठप्प झाली. पालघर जिल्ह्यातील मासेमारीकरिता खोल समुद्रात गेलेल्या वसई, अर्नाळा, नायगाव, खोचिवडे, उत्तन येथील अनेक बोटींनी वादळाच्या काळात डहाणू तथा गुजरातमधील बंदरात कित्येक दिवस आश्रय घेतला, त्यानंतर काही दिवस मासेमारी पुन्हा सुरू झाली. मात्र, नवरात्र उत्सव सुरू होताच पुन्हा बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने अतिवृष्टी आणि वादळी हवामानामुळे मासेमारी ...पान ६ वर

# पालघरमध्ये अभिजात मराठी राजभाषा दिवस साजरा व सप्ताहाचा शुभारंभ




**पालघर : वार्ताहर**

मराठी भाषेच्या गौरवशाली परंपरेचा आणि सांस्कृतिक वैभवाचा उत्सव म्हणून अभिजात मराठी राजभाषा दिवस आज ३ ऑक्टोबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात झाला. हा सप्ताह ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत साजरा होणार आहे. त्याचा शुभारंभ देखील आज करण्यात आला. लोकशाहीर आत्माराम पाटील सभागृह, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे जिल्हाधिकारी डॉ. इंदूराणी जाखड यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध साहित्यिक, कवी व गीतकार प्रसाद कुलकर्णी, तसेच महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम विनोदी कलाकार प्रा. अजितकुमार कोष्टी, हे प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अप्पर जिल्हाधिकारी भाऊसाहेब पटांगडे, अप्पर पोलिस अधीक्षक विनायक नराळे यांची प्रमुख उपस्थिती होती. शुभारंभ कार्यक्रमात मराठी भाषेचे महत्त्व, तिची लवचिकता आणि समाजाला एकत्र बांधण्याची ताकद यावर प्रकाश टाकण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ. जाखड यांनी मराठी भाषेचे स्वरूप अधोरेखित करताना सांगितले, मराठी ही प्रेमळ आणि मनाला जोडणारी भाषा आहे. तिचे संवर्धन आणि संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. साहित्यिक प्रसाद कुलकर्णी यांनी संत ज्ञानेश्वर, तुकारामांपासून ते आधुनिक काळातील लेखक-कवीं पर्यंतच्या साहित्यिक योगदानाचे दाखले देत मराठीच्या सामर्थ्याचा परिचय करून दिला. अजितकुमार कोष्टी यांनी आपल्या खुमासदार शैलीत मराठीचे दैनंदिन जीवनातील स्थान आणि तिची अनोखी लय स्पष्ट केली, ज्यामुळे उपस्थितांमध्ये हशा आणि विचारांचे सुंदर मिश्रण घडले. मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी वक्त्यांचे आणि कार्यक्रमाचे कौतुक करताना म्हटले की, मराठी भाषेचा गौरव साजरा करणारा हा सप्ताह खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण आहे. अशा उपक्रमांमुळे आपली भाषा आणि संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ...पान ६ वर

# भिवंडीत बनावट नोटांसह अग्निशस्त्र बाळगणाऱ्या दोघांना अटक, कारसह ६ लाख ३३ हजारांचा मुद्देमाल केला जप्त



**भिवंडी : वार्ताहर**

बनावट नोटांची अदलाबदल करण्यासाठी भिवंडीत आलेल्या नाशिकच्या दुकलीला बेड्या ठोकण्यात भिवंडी गुन्हे शाखेला यश आले आहे.त्यानुषंगाने पोलिसांनी सापळा कारवाई दरम्यान दोघांना ताब्यात घेऊन अटक केली आहे. शिवानंद ज्ञानेश्वर कोळी (२४), राहुल रामदास शेजवळ (२४, दोघे रा.नाशिक) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. गुन्हे शाखेने दिलेल्या माहितीनुसार,२९ सप्टेंबर रोजी बनावट नोटांची अदला बदली साठी काही इसम भिवंडीत येणार असल्याची माहिती भिवंडी गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाला मिळाली होती. त्यानुषंगाने वपोनि जनार्दन सोनवणे यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि श्रीराज माळी,मिथुन भोईर, पोउनि रविंद्र बी. पाटील, रामचंद्र जाधव, सपोउनि सुधाकर चौधरी, सुनिल साळुंके, पोह निलेश बोरसे, प्रशांत राणे, प्रकाश पाटील, सुदेश घाग, रंगनाथ पाटील, शशिकांत यादव, किशोर थोरात, मपोहवा माया डोंगरे, पोशि अमोल इंगळे, भावेश घरत, विजय कुंभार, सर्फराज तडवी, चापोशि रविंद्र साळुंखे आदि पोलिस पथकाने चाविंद्रा रोड येथील मिल्लत नगर मधील ममता हॉस्पिटल च्या बाजूला असलेल्या फरहान हॉलकडे जाणाऱ्या रस्त्यावर सापळा रचला असता शिवानंद आणि राहुल हे दोघे इको फोर्ड गाडीतून संशयित रित्या ...पान ६ वर

# पालघर जिल्हा महिला उपाध्यक्षपदी प्रतिभा चोरघे यांची निवड

**विरार : वार्ताहर**



सेवेत असताना सर्व. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी एकत्र असतात सेवानिवृत्तीनंतर ते एकत्र येत नाहीत, ते एकत्र यावे संघटित राहावे या दृष्टीने महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षक कर्मचाऱ्यांची संघटना स्थापन झालेली आहे. शासनातर्फे सेवा निवृत्तसाठी राबवल्या जाणाऱ्या योजनाची माहिती पर्यायाने त्यापासून मिळणारे लाभ सर्व सेवानिवृत्तांना मिळावे यासाठी या संघटनेची स्थापना अध्यक्ष मधुकर जंगम सांगली यांनी केली आहे. काही कारणास्तव सेवेत असताना अपुरे राहिलेले आपले प्रश्न सोडवण्यासाठी ही संघटना कार्यरत आहे या संघटना मार्फत अनेक प्रश्न सोडवले आहेत. या संघटनेच्या पालघर जिल्ह्याच्या महिला उपाध्यक्ष म्हणून प्रतिभा प्रकाश चोरघे सेवानिवृत्त मुख्याध्यापिका काशिदास घेलाभाई हायस्कूल आगाशी, विरार अर्नाळा शिक्षण संस्था यांची निवड झालेली आहे. त्याबद्दल सर्व सहकार्याकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष मधुकर जंगम व पालघर जिल्ह्याचे अध्यक्ष शिवाजी पाटील यांचे प्रतिभा चोरघे यांनी आभार मानले आहेत.

# महापालिका आयुक्तांनी साधला नागरिकांशी संवाद

**लातूर : प्रतिनिधी**



लातूर महापालिका आयुक्त श्रीमती मानसी यांनी शहरातील विविध ठिकाणी भेटी देऊन नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्या. या समस्यांची सोडवणूक करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. श्रीमती मानसी यांनी महात्मा गांधी कुष्ठधाम येथे भेट दिली. तेथील कुष्ठरुग्णांसाठी मनपाने घरे बांधून दिलेली आहेत. ही घरे आता मोडकळीस आली असून त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात येत होती. श्रीमती मानसी यांनी तेथे भेट देऊन घरांची पाहणी केली. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. शहरातील मोहन नगर येथे मनपाच्या जागेवर नागरिक अनेक वर्षांपासून राहत आहेत. कॉईलनगर येथेही अशीच परिस्थिती आहे. या नागरिकांना पक्की घरे नाहीत. कबालेही देण्यात आलेले नाहीत. मोहन नगर येथील प्रस्ताव यापूर्वीच जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आलेला आहे. तेथील नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत श्रीमती मानसी यांनी त्यांना पालिकेच्या वतीने केल्या जात असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. शहरात जयनगर येथे सेफ्टी टँकची अस्वच्छता व दुर्गंधी विषयी नागरिकांच्या तक्रारी होत्या. तेथे सेफ्टी टँक बांधून देण्यात आलेला होता. तो मोडकळीस आलेला असून दुरुस्ती करणे आवश्यक होते. त्या परिसराची पाहणी करून आयुक्तांनी तात्काळ संपूर्ण परिसर स्वच्छ करण्याचे आदेश दिले. विजयनगरमध्ये पूर्वी बांधून दिलेली घरे मोडकळी आल्याने त्यांची दुरुस्ती करण्यासंदर्भात नागरिकांची मागणी होती. त्याचीही श्रीमती मानसी यांनी पाहणी केली. ज्या कारणांसाठी तक्रारी घेऊन नागरिक पालिकेत येत होते अशा ठिकाणांना भेटी देऊन नागरिकांच्या समस्यांची तात्काळ सोडवणूक करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.